किंमत ८ आणे

काँग्रेसची आठवणी



लेखक :— श्री. रा. म. कानिटकर, एम्. ए.

किंमत ८ आणे.



२८ डिसेंबर १८८५ हा दिवस हिंदी राष्ट्राच्या इतिहासांत तेजस्वी सुवर्णाक्षरांनीं लिहिण्यासारखा आहे. या दिवशीं घडलेल्या एका घटनेमुळें हिंदी राष्ट्राच्या आधुनिक जीवनांत क्रांति झाली व हिंदी जनता हा नुसता मातीचा थंड गोळा नसून त्याच्या अणुरेणूंत चैतन्य भरलेलें आहे याची जाणीव परकीयांप्रमाणें स्वदेशीयांनाहि झाली. २८ डिसेंबर रोजीं मुंबई येथें ज्या हिंदी राष्ट्रीय सभेचा जन्म झाला ती राष्ट्रीय सभा आज येवढी वर्धिष्णु झाली आहे कीं, तिनें हिंदी जनतेचें जीवन बहुतांशीं व्यापून टाकलें आहे. गेल्या साठ वर्षांच्या दीर्घ कालावधींत

काँग्रेसनें काय कार्य केलें याची प्रत्येक सुजाण हिंदवासीयास यथार्थ कल्पना आहे. तथापि या काँग्रेसच्या षष्ठ्यब्दिपूर्ति-निमित्त तिच्या आतांपर्यंतच्या कामगिरीचें सिंहावलोकन करणें इष्ट होईल.

काँग्रेसचा इतिहास म्हणजे परकीय राजसत्तेपासून मुक्त होण्याच्या प्रयत्नांचा इतिहास असें यथार्थतेनें म्हणण्यास हरकत नाहीं. काँग्रेसनें देशांत जागृति, क्षोभ व चैतन्य निर्माण केलें. काँग्रेसपूर्वी देशांत एकसंघीपणा नव्हता; काँग्रेसनें एक-राष्ट्रीयत्वाची जागृति केली. काँग्रेसनें हिंदुस्थानांतील विविध प्रांत, पंथ व जाति यांच्यांत एकत्वाची, राष्ट्रीयत्वाची भूमिका उत्पन्न केली आणि बहुजनसमाजांत स्वातंत्र्यासाठीं क्षोभ आणि पारतंत्र्याची चीड उत्पन्न केली. या साठ वर्षांत काँग्रेस संस्थेनें



मुंबई : १८८५

जें प्रचंड कार्य केलें त्यामुळेंच काँग्रेस ही सबंध देशाची एकमेव राष्ट्रीय संस्था होऊन राहिली आहे. अर्जविनंत्यांपासून राजनिष्ठेच्या ठरावापासून तों मर्यादित अधिकार, सुराज्य, स्वराज्य, वसाहतीचें स्वराज्य, जबाबदारीचें स्वराज्य, स्वातंत्र्य, पूर्ण स्वातंत्र्य, साम्राज्यांतून बाहेर पडण्याची मागणी आणि शेवटीं 'चले जाव' अशा उत्तरोत्तर वरचढ ध्येयशिखराकडे मार्गक्रमण करीत काँग्रेस आज एकसष्टाव्या वर्षांत दाखल होत आहे.

काँग्रेस हें हिंदी स्वातंत्र्याचें किंवा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या लढ्याचें प्रतीक आहे. सबंध देशांत काँग्रेसएवढी बहुजनसमाजापर्यंत पोंचलेली व देशाच्या कानाकोंपऱ्यांत पसरलेली अशी दुसरी संस्था नाहीं. काँग्रेस ही जनतेचीं गाऱ्हाणीं वेशीवर टांगून त्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेणारी जबरदस्त संस्था आहे. त्यामुळें जनतेचा तिला उत्तरोत्तर पाठिंबाच मिळत आहे. तिच्या



दादाभाई नौरोजी, कलकत्ता : १९०६

आतांपर्यंतच्या आयुष्यांत तिच्यावर अनेक गंडांतरें आलीं, पण त्या दिव्यांतून ती तावूनसुलाखून निघाली, इतकेंच नव्हे तर तिची प्रगतीच झाली. काँग्रेसनें केलेलें कार्य विविध प्रकारचें आहे. जनतेंत जागृति उत्पन्न करून तिला आपल्या हक्कांची जाणीव करून देणें व ते हक्क मिळविण्यासाठीं तिला लढा करावयास तयार करणें एवढेंच कांहीं काँग्रेसचें काम नाहीं. या वैचारिक कामगिरीशिवाय काँग्रेसनें आतांपर्यंत जीं विधायक कार्यें केलीं आहेत त्यांना इतिहासांत तोड सांपडणार नाहीं. स्वदेशीची व बहिष्काराची चळवळ ही देशाच्या औद्योगीकरणास उपयोगी पडली त्याप्रमाणें खादीच्या प्रचारामुळें अनेक अर्धपोटी लोकांना चरितार्थाचें साधन मिळालें. ग्रामोद्योग संघ व अखिल भारतीय चरखा संघ यांच्यामुळें गरजू लोकांना केवढें आर्थिक सहाय्य मिळालें आहे याची जाणिव शहरी लोकांना फारशी नसली तरी ग्रामीण जनतेला या संघांची उपयुक्तता पूर्णपणें माहीत आहे. अखिल भारतीय चरखा संघ आज सुमारें ३ लक्ष लोकांना काम देत आहे व हजारोंना अन्नवस्त्र पुरवीत आहे. हरिजनसेवक संघानें अस्पृश्यतेच्या उच्चाटनाचे व अस्पृश्यांना माणुसकीचे हक्क मिळवून देण्याचे जे प्रयत्न चालविले आहेत तसे पद्धतशीर व जोरदार प्रयत्न आजपर्यंत कोणी केलेले नाहींत. हरिजनांवर होणाऱ्या अन्यायांचें निवारण करण्यासाठीं तनमनधनें झटणारी ही एकच संस्था आहे. दारूबंदी, हिंदी प्रचार इत्यादि अनेक विधायक कामें करून काँग्रेसनें आपली व्यापक दृष्टि प्रकट केली आहे. काँग्रेसनें हिंदी जनतेसाठीं काय केलें असा प्रश्न विचारण्यापेक्षां काँग्रेसनें काय केलें नाहीं असा प्रतिप्रश्न विचारणें अधिक सयुक्तिक होईल. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे

हिंदी राष्ट्राची आज जी प्रगति झाली आहे, हिंदी जनतेंत जी राजकीय जागृति झाली आहे व तिच्यांत जी स्वातंत्र्याची तळमळ उत्पन्न झाली आहे ती केवळ कॉंग्रेसमुळेंच होय. कॉंग्रेस हीच हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्याची तेजस्वी मार्गदीपिका आहे.

कॉंग्रेस आज स्वातंत्र्यवादी हिंदी राष्ट्राची संस्था असली तरी तिची स्थापना सरकारी नोकरींत असलेल्या एका इंग्रज गृहस्थानें केली, हा योगायोग विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे. कॉंग्रेस-स्थापनेच्या कामीं आय्. सी. एस्. मधून निवृत्त झालेले ए. ओ. ह्यूम यांना तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड डफरिन यांचें प्रत्यक्षाप्रत्यक्ष सहाय्य मिळालें ही गोष्टहि नमूद करण्यासारखी आहे. कॉंग्रेस संस्था स्थापण्याची जरूरी कां पडली हें पाहण्यासाठीं थोडा मागील इतिहास पाहिला पाहिजे. "१८५७ चें बंड संपून राष्ट्रांत स्थिर-स्थावर होत होती. निरनिराळ्या शिक्षणसंस्था निघत होत्या. पाश्चात्य राष्ट्रांतील राजकीय तत्त्वज्ञानाचा प्रचार होत चालला होता व इंग्रजांच्या राज्यपद्धतीविषयीं आदर वाटूं लागला होता. सामाजिक व शैक्षणिक प्रश्नांसंबंधीं जोरजोराचे विचार उसळूं लागले होते. या विचारांचें प्रतिबिंब त्या काळीं निघालेल्या संस्थांच्या द्वारें दृग्गोचर होऊं लागलें होतें. '५७ च्या बंडापूर्वी ६ वर्षें बंगालमध्यें प्रसन्नकुमार टागोर व डॉ. राजेंद्रलाल मित्र यांनीं ब्रिटिश इंडिया असोसिएशन काढली आणि मुंबईस जगन्नाथ शंकरशेठ, दादाभाई नौरोजी यांनीं बॉंबे असोसिएशन स्थापन केली. मद्रासमध्यें 'हिंदु' पत्रानें आपल्या राजकीय जीवनाला १८७८ मध्यें सुरुवात केली. आणि त्याच सुमारास पुणें येथें रा. ब. नूलकर, सितारामपंत चिपळूणकर प्रभृतींनीं सार्वजनिक

सभा स्थापन करून राजकीय आस्तित्व प्रकट केलें. या सर्व संस्था सरकारच्या कारभारावर नुसती टीका करीत."

इंग्लंडमध्यें त्या काळीं जॉन ब्राइट, हेन्री फॉसेट व चार्लस ब्रॅडलॉ हे हिंदुस्थानचे कैवारी होते व हिंदी जनतेच्या हितासाठीं ते पार्लमेंटांत भांडत असत. या तिघांप्रमाणेंच हिंदुस्थानांतहि सर हेन्री कॉटन, सर जॉर्ज वेडरबर्न व ए. ओ. ह्यूम या तीन सरकारी नोकरांना हिंदुस्थानाविषयीं कळकळ वाटत होती. हिंदुस्थानांत त्या सुमारास दडपशाहीचा कडक अंमल होता. वृत्तपत्रांची मुस्कटदाबी झाली होती व दुष्काळ, रोग, दारिद्य, हिंदी लोकांबद्दल तुच्छता, मतप्रचाराला बंदी वगैरेमुळें हिंदी जनता गांजून गेली होती. ही परिस्थिति असह्य झाल्यामुळें लोकांना आपल्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठीं बंगालमध्यें इंडियन असोसिएशन ही संस्था बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं १८७६ सालीं स्थापन केली.

१८८४ सालीं बंगालमध्यें नॅशनल लीग, मद्रासमध्यें महाजन-सभा व मुंबईस ३१ जानेवारी १८८५ रोजीं बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन या संस्था हिंदी जनतेच्या संघटनेसाठीं निघाल्या होत्या. या सर्व संस्था आपापल्यापरीनें काम करीत होत्या. पण या संस्थांतील कार्यकर्त्या पुढाऱ्यांना एकत्र आणण्याची कल्पना १८८३ सालीं कलकत्त्याला भरलेलें प्रदर्शन, इंडियन असोसिएशनमार्फत भरलेली परिषद, व्हाइसरॉयांचा दिल्ली दरबार, अड्यार येथें भरलेली थिऑसफिक परिषद इत्यादिकांवरून सुचली असें म्हणतात. पण या संस्थांच्या संहतीकरणाचें खरें कार्य ह्यूम यांनीं केलें, म्हणूनच त्यांना काँग्रेसचे जनक म्हणण्यांत येतें. त्यांनीं १८८३ सालीं कलकत्ता विद्यापीठांतील पदवीधरांना उद्देशून

एक पत्र लिहिलें. देशांतील सुशिक्षित लोकांना तें बरेंच झोंबलें व त्यावरून बराच वादविवाद झाला. त्याचा परिणाम होऊन सुरेंद्रनाथ बानर्जी व तेलंग यांनीं हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांना एकत्र बोलवावें असें ठरलें व पुण्याला नाताळांत ही परिषद भरवावी असें पत्रक काढण्यांत आलें. या पत्रकांत पुढील मजकूर होता:

"हिंदी राष्ट्रीय संघाची परिषद पुणें येथें २५ ते ३१ डिसेंबरपर्यंत भरणार आहे. मुंबई, बंगाल व मद्रास या प्रांतांतील इंग्रजी भाषा उत्तम जाणणाऱ्या प्रमुख प्रातिनिधिपुढाऱ्यांची ही परिषद होईल. ह्या परिषदेचे उद्देश : (१) एकमेकांचे राष्ट्रीय प्रगतीकरितां चाललेले प्रयत्न माहीत व्हावेत, (२) पुढील वर्षाचा राजकीय कार्यक्रम आंखावा. ही सभा अप्रत्यक्षपणें भावी पार्लमेंटची जननी आहे आणि हें कार्य नीट चाललें तर हिंदुस्थान प्रातिनिधिक संस्थेला नालायक आहे या आक्षेपाला उत्तर मिळेल. (३) पाहिल्या परिषदेंत दरवर्षीच्या सभा पुण्यासच भराव्या कां निरनिराळ्या ठिकाणीं भराव्या हें ठरेल. (४) यंदाच्या वर्षी पुण्यास अधिवेशन असल्यामुळें सार्वजनिक सभेचे रा. चिपळूणकर व इतर मंडळी यांचें स्वागतमंडळ होईल व ते सर्व व्यवस्था ठेवतील. पर्वतीच्या टेकडीवरील पेशव्यांच्या बागेंत (हिराबाग) ही परिषद भरेल व रहाण्याची सोय होईल. आणि प्रत्येकाला सोईस्कर जागा देण्यांत येईल. पांगून रहाण्याऐवजीं एकत्र रहाण्यानें विचारविनिमयाला सवड मिळते म्हणून ही योजना अधिक चांगली आहे. (५) प्रतिनिधींनीं पुण्याला जाण्यायेण्याचें भाडें स्वतःच खर्चावें, पण पुण्याला उतरल्यापासून गाड्या, जागा, भोजन वगैरेंसाठीं खर्च पडणार नाहीं. हा खर्च स्वागतमंडळ करील; पण एकाद्याला ह्या सवलतीचा मोफत फायदा घेऊं नये असें वाटत

असेल तर त्यानें देणगी द्यावी व ती शिल्लक उरल्यास पुढील स्वागतमंडळाकडे पोंचती होईल. (६) या सभेला पुण्याचे स्नेही वगळून मुंबई इलाखा, सिंध व वऱ्हाड मिळून २० जण येतील; मद्रास व दक्षिण बंगाल यांतून प्रत्येकीं तितकेच येतील व वायव्यप्रांत, पंजाब व अयोध्या या प्रांतांतून निम्मे येतील. ''

याप्रमाणें काँग्रेसच्या संस्थापनेचें पत्रक प्रसिद्ध झाल्यानंतर तिची घटना वगैरे तयार करण्याचें काम ह्यूम यांच्याकडेच सोंपविण्यांत आलें. ॲलन ऑक्टेव्हियन ह्यूम हे हिंदुस्थान सरकारच्या गृहखात्याचे चिटणीस होते. दहा वर्षें नोकरी केल्यावर हिंदी जनतेसाठीं कांहींतरी करावें या उद्देशानें १८८२ मध्यें त्यांनीं राजीनामा दिला. ते स्कॉच होते. हिंदुस्थानांतील लोकांनीं एकत्र यावें असें त्यांना वाटे, त्यामुळें या पहिल्या हिंदी राष्ट्रीय संघाच्या सूत्रचालकत्वाचें काम त्यांच्यावर सोंपविण्यांत आलें. यासाठीं ते इंग्लंडला गेले. जाण्यापूर्वी व्हाइसरॉय लॉर्ड डफरीन यांची त्यांनीं भेट घेतली. हिंदी लोकांची अशी एकादी संस्था निघाली तर सरकारला लोकमत कळण्याच्या दृष्टीनें फार उपयोग होईल असें डफरीन यांना वाटलें व त्यांनीं काँग्रेससारखी संस्था निघावी असें बोलून दाखविलें. लॉर्ड डफरीन यांच्या या सहानुभूतीमुळें पुष्कळजण त्यांची काँग्रेसच्या उत्पादकांत गणना करतात आणि तें अगदींच चुकीचें नाहीं. काँग्रेसच्या नांवाबद्दलहि प्रारंभीं बरीच चर्चा झाली. नॅशनल युनियन, नॅशनल कॉन्फरन्स इत्यादि नांवें पुढें आलीं. पण ' इंडियन नॅशनल काँग्रेस ' हें नांव सर्वानुमतें ठरलें. पहिल्या काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठीं लॉर्ड रे यांचें नांव प्रथम सुचाविलें गेलें होतें, पण सरकारी अधिकारी अध्यक्ष नसावा असें

बहुमतानें ठरल्यावर कलकत्ता हायकोर्टातील प्रसिद्ध वकील उमेशचंद्र बानर्जी यांची पहिल्या काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड झाली.

हें पहिलें अधिवेशन पुण्यास भरणार होतें, पण पुण्यांत कॉलरा झाल्यामुळें तो मान मुंबईला मिळाला. २८ डिसेंबर १८८५ रोजीं गवालिया मैदानाजवळील लक्ष्मी—नारायण—मंदिराला जोडून असलेल्या गोकुळदास तेजपाळ संस्कृत विद्यालयाच्या सभागृहांत दुपारीं १२ वाजतां पहिली काँग्रेस भरली. या बैठकीला निरनिराळ्या प्रांतांतले ७२ प्रतिनिधि हजर होते. काँग्रेसच्या या पहिल्या बीजरूप अधिवेशनांतूनच पुढें जो प्रचंड वटवृक्षाचा विस्तार झाला त्याची कल्पना त्या वेळीं जमलेल्या व्यक्तींना आली असेल काय ?

हिंदुस्थानांत अशा तऱ्हेचें संमेलन अगदीं पहिलेंच असल्यामुळें त्याला देशांतील बहुतेक प्रमुख लोक हजर होते. दादाभाई नौरोजी, न्या. तेलंग, फेरोजशहा मेथा, वाच्छा, मंडलिक, चंदावरकर, रहिमतुल्ला सयानी, रंगय्या नायडू, लाला मुरलीधर, गंगाप्रसाद वर्मा, सभापति मुदलियार, वीर राघवाचार्य, आनंदाचार्लु, कृ. ल. नूलकर, सीताराम हरि चिपळूणकर, गोपाळराव आगरकर, वामन शिवराम आपटे, सुब्रह्मण्यम् अय्यर वगैरे प्रतिनिधि आले होते. न्यायमूर्ति रानडे, डॉ. भांडारकर, प्रो. काथवटे, दि. ब. रघुनाथराव, डॉ. एस्. व्हाईट, मद्रासचे कलेक्टर वगैरे प्रमुख सरकारी अधिकारी पाहुणे म्हणून या अधिवेशनाला आले होते. पहिल्या अधिवेशनांत जे ठराव झाले त्यावरून तत्कालीन नेत्यांना केवढी राजकीय दूरदृष्टि होती याचें प्रत्यंतर येतें. रॉयल कमिशन नेमून हिंदी राज्यकारभाराची चौकशी करणें, स्टेट सेक्रेटरीचें कौन्सिल रद्द करणें, मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांची सुधारणा

करणें, लष्करी खर्चात कपात करणें, कापसाच्या आयातीवर कर बसविणें वगैरे प्रश्नांची चर्चा या बैठकींत झाली. न्यायमूर्ति रानडे यांनींहि एका ठरावावर भाषण केलें. अशा प्रकारें काँग्रेसचें हें पाहिलें अधिवेशन मोठ्या उत्साहानें राणीच्या जयजयकारांत पार पडलें.

काँग्रेसचें अधिवेशन दरवर्षी भरवावें असें ठरलें, त्याप्रमाणें काँग्रेसच्या बैठकी सालोसाल भरत गेल्या. पण १९०५ पर्यंतचीं पहिलीं कांहीं अधिवेशनें म्हणजे आरामखुर्चीवरचें राजकारण होतें. या बैठकींसाठीं प्रांताप्रांतांतले प्रमुख वकील, डॉक्टर व सार्वजनिक कार्यकर्ते येत, दोन तीन दिवस आरामशीर चर्चा करीत, सरकारला फारसा विरोध न होईल अशा प्रकारचे निरुपद्रवी ठराव करीत व बादशाही मेजवान्यांवर हात मारीत हे प्रतिनिधि निघून जात. हे तत्कालीन पुढारी मोठमोठे हुद्देदार, श्रमिंत व सेवानिवृत्त सरकारी अधिकारी असे असल्यामुळें ते जोंपर्यंत काँग्रेसमध्यें होते तोंपर्यंत काँग्रेसची प्रगति होणें शक्य नव्हतें. जनतेपासून दूर असलेले हे पुढारी काँग्रेसला लोकाभिमुख करूं शकत नव्हते यांत आश्चर्य नाहीं. काँग्रेसच्या घटनेंत जसजसा फरक पडत गेला, काँग्रेसचें ध्येय जसजसें विकास पावूं लागलें तसतसा काँग्रेसचा उत्कर्ष व विस्तार होत गेला. म्हणून काँग्रेसमधील ठरावांच्या बरोबरीनें काँग्रेसच्या घटनेचा इतिहास लक्षांत घेतला पाहिजे.

काँग्रेसच्या आजच्या विस्ताराचें व विकासाचें मूल कारण काँग्रेसची घटना हें आहे. काँग्रेसच्या घटनेचा इतिहास म्हणजे काँग्रेसचे उद्देश, हेतु व ध्येय यांचाच इतिहास होय. काँग्रेसचा उत्कर्ष हा काँग्रेसमध्यें पास झालेल्या ठरावांवर जितका अवलंबून

आहे, तितकाच तो घटनेंतील उत्क्रांतीवरहि आहे. कॉँग्रेसनें प्रारंभींचीं कांहीं वर्षें एकाद्या निश्चित ध्येयाशिवाय आपलें कार्य चालविलें होतें. कारण कॉँग्रेसच्या उत्पादकांचें व त्यांत प्रामुख्यानें भाग घेणाऱ्या पुढाऱ्यांचें असें मत होतें कीं, कॉँग्रेस ही एक वार्षिक मजलस आहे, तें एक स्नेहसंमेलन आहे. प्रचलित राजकीय विषयांची चर्चा करून देशाच्या चालू राज्यपद्धतींत हरघडीं आढळून येणाऱ्या अन्यायांची दाद लावण्याची खटपट करणें एवढाच ह्या पुढाऱ्यांच्या मतें कॉँग्रेसचा उद्देश होता. देशांतील निरनिराळ्या जाती, धर्म, पंथ, भाषा, प्रांत इत्यादिकांतील अलगपणा व तुटकपणा नाहींसा करणें व सर्व प्रांतांत परस्परांविषयीं ऐक्याची व स्नेहभावाची वृत्ति उत्पन्न करणें यापलीकडे कॉँग्रेसनें प्रारंभीं आपल्यापुढें दुसरें ध्येय ठेवलें नव्हतें. कॉँग्रेस वयांत येईपर्यंत तिचें उद्दिष्ट निश्चित झालें नव्हतें असें म्हटल्यास चालेल.

१८९९ च्या लखनौ कॉँग्रेसमध्यें कॉँग्रेसची पहिली घटना तयार झाली. तिच्यांत 'सनदशीर मार्गांनीं हिंदी राष्ट्राचें हितसंवर्धन करणें हें राष्ट्रीय सभेचें ध्येय आहे' असें ठरविण्यांत आलें. खेडोपाडीं व गांवोगांव कॉँग्रेसचा प्रसार करण्याबद्दलचा ठराव १९०६ सालीं झाला. सुरतेच्या कॉँग्रेसपर्यंत कॉँग्रेसला पद्धतशीर प्रातिनिधिक स्वरूप आलें नव्हतें म्हणून तेथें बखेडा झाला. केवळ व्यवस्थित घटनेच्या अभावामुळें सुरत कॉँग्रेस मोडली याची फारच थोड्यांना जाणीव असेल.

सुरतेपासून म्हणजे १९०७ पासून १९१६ पर्यंत कॉँग्रेस मवाळांच्या म्हणजे तत्कालीन प्रागतिकांच्या हातीं होती. मवाळांनीं कॉँग्रेसचें ध्येय पुढीलप्रमाणें १९०८ सालीं घोषित केलें. "साम्राज्यांतील इतर वसाहती ज्या प्रकारचें स्वराज्य भोगतात



सुरत : १९०७

तशा प्रकारचें स्वराज्य मिळविणें हें आमचें राजकीय ध्येय आहे. " कॉंग्रेसच्या घटनेंत मुख्य प्रश्न ध्येयाचा असल्यामुळें त्या प्रश्नावरच जहाल आणि मवाळ असे दोन भेद पडले. आणि ज्यांना हें ध्येय मान्य झालें नाहीं ते कॉंग्रेस सोडून गेले. अर्ज, विनंत्या, ठराव, निषेध, मुलाखती, शिष्टमंडळें इत्यादि मार्गांनीं वसाहतीचें स्वराज्य मिळवूं पहाणाऱ्या याचनावादी मवाळांचें स्वयंनिर्णयात्मक स्वराज्य मिळवूं इच्छिणाऱ्या हक्कवादी जहालांबरोबर कसें पटावें ? जहाल-मवाळांच्या फाटाफुटीला कॉंग्रेसचें ध्येयच कारणीभूत झालें, हें स्पष्ट आहे. ' ब्रिटिश साम्राज्यांत राहून सनदशीर मार्गांनीं वसाहतीच्या धर्तीवर



लखनौ : १९१६

स्वायत्तता मिळविणें ' हें १९२० पर्यंत काँग्रेसचें ध्येय होतें. टिळकांच्या होमरूल लीगचेंहि यापेक्षां निराळें उद्दिष्ट नव्हतें. १९२० च्या नागपूर काँग्रेसमध्यें काँग्रेसच्या ध्येयांत गांधीजींनीं बदल घडवून आणला. ' वसाहतींच्या धर्तीवर ' हे शब्द काढून ' न्याय्य व शांततेच्या मार्गांनीं ' हे शब्द घालण्यांत आले. १९२७ सालीं मद्रास काँग्रेसमध्यें ' ब्रिटिश साम्राज्यांतर्गत ' या शब्दांना कायमची मूठमाती देण्यांत आली व १९२९ च्या लाहोर काँग्रेसमध्यें पूर्ण स्वराज्य किंवा संपूर्ण स्वातंत्र्य हें काँग्रेसचें ध्येय आहे असें जाहीर करण्यांत आलें. काँग्रेसच्या ध्येयाचा हा विकास लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

काँग्रेसचें लोण खेडोपाडीं पोंचावें म्हणून १९२० नंतर काँग्रेस सभासदाची वार्षिक वर्गणी फक्त ४ आणे ठेवण्यांत आली. त्यापूर्वी ती १ रुपया होती. पुढें सुताची व खादीचीहि अट घालण्यांत आली. काँग्रेसच्या बैठकींतून इंग्रजीचें उच्चाटन होऊन हिंदीला बोधभाषेचें स्थान मिळालें. वार्षिक अधिवेशनाच्या प्रतिनिधींची संख्या मर्यादित करण्यांत आली. ५० हजार लोकसंख्येला १ प्रतिनिधि असें प्रमाण ठरलें. आणि हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांची भाषावार विभागणी करून काँग्रेसनें सबंध देशाचे २१ विभाग अगर सुभे केले. ते म्हणजे अजमेर, आंध्र, आसाम, उत्कल, कर्नाटक, केरल, गुजराथ, तामिलनाड, दिल्ली, पंजाब, बंगाल, बिहार, ब्रह्मदेश, मध्यप्रांत, महाकोशल, महाराष्ट्र, मुंबई, वऱ्हाड, संयुक्तप्रांत, सिंध व सीमाप्रांत हे होत.

काँग्रेसच्या घटनेबरोबर १८८५ ते १९१५ पर्यंत काँग्रेसमध्यें जे ठराव होत त्यांची या ठिकाणीं संकलित माहिती देणें जरूर आहे. १९१५ सालापर्यंत दरवर्षीं राजनिष्ठेचा ठराव पास होत असे. या सालीं बरेच प्रतिनिधि हजर होते व अनेक विषयांवरील ठराव मंजूर झाले. या ३० वर्षांच्या कालावधींत काँग्रेसनें कोणती वैचारिक व राजकीय प्रगति केली याचें प्रत्यंतर पहावयाचें असेल तर १९१५ च्या मुंबई काँग्रेसमध्यें पास झालेले ठराव नजरेखालीं घालावेत. गो. कृ. गोखले, फेरोजशहा मेथा, सर हेन्री कॉटन व केर हार्डी यांच्या मृत्यूबद्दल पहिले चार दुखवट्याचे ठराव करण्यांत आले. पांचवा राजनिष्ठेसंबंधींचा होता. सहाव्या ठरावान्वयें महायुद्धांत ब्रिटिश राष्ट्रानें न्याय्य पक्ष स्वीकारल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करण्यांत आलें. लॉर्ड हार्डिज यांच्या कारकीर्दीची मुदत वाढविण्यांत यावी अशी विनंति एका स्वतंत्र ठरावान्वयें

करण्यांत आली. लष्करांत व आरमारांत हिंदी लोकांचा प्रवेश, हत्यारांचा कायदा, लष्करी व आरमारी कॉलेजें, दक्षिण आफ्रिका व कानडा येथील हिंदी लोकांची गाऱ्हाणीं, मुदतबंद मजूरपद्धति, न्याय व अंमलबजावणी खात्यांची फारकत, पंजाब, मध्यप्रांत व ब्रह्मदेश यांतून हायकोर्टें स्थापन करणें, प्रेसॲक्टचा निषेध, जकातीचें स्वातंत्र्य, कायमधारापद्धति, औद्योगिक व धंदेशिक्षणाची व्यवस्था, आयात व निर्यात मालावर जकात बसविण्याचे हक्क देण्यांत यावे इत्यादि पंचवीस ठराव या अधिवेशनांत पास झाले. पण सर्वांत महत्त्वाचा ठराव स्वराज्यासंबंधाचा होता. हिंदुस्थानास स्वराज्याच्या दृष्टीनें पुढील महत्त्वाच्या सुधारणा बहाल करण्यांत याव्याः प्रांतिक स्वायत्तता द्यावी, कायदे कौन्सिलांची सुधारणा व वाढ करावी, ज्या प्रांतांत कायदेमंडळें नसतील तेथें तीं स्थापन करावीं, कार्यकारी कौन्सिलांची पुनर्घटना करावी, इंडिया कौन्सिल रद्द करावें किंवा त्यांत सुधारणा करावी व स्थानिक स्वराज्याच्या बाबतींत उदार धोरण स्वीकारण्यांत यावें. या ठरावांत अशी आशा करण्यांत आली होती कीं, ऑ. इं. कॉंग्रेस कमिटी व मुस्लिम लीग या दोन्ही संस्थांनीं मिळून स्वराज्याची योजना तयार करावी. या ठरावावरच पुढें लखनौ कॉंग्रेसमध्यें—हिंदुमुसलमानांचें ऐक्य घडून आलें व कॉंग्रेस व लीग यांचें एकीकरण झालें. आज मुस्लिम लीग व कॉंग्रेस यांचीं ध्येयें उत्तर दक्षिण ध्रुवाप्रमाणें असलीं तरी कॉंग्रेसनें मुसलमानांबरोबर सलोखा घडवून आणण्याचा प्रयत्न किती तरी वर्षांपासून चालविलेला आहे हें दिसून येईल.

१९१८ सालापर्यंत कॉंग्रेसमध्यें जरी राजनिष्ठेचे ठराव होत व अगदीं नेमस्त वृत्तीचे, सरकारशीं सहकारिता करणारे व ब्रिटिशांच्या वचनांवर विश्वास ठेवणारे लोक कॉंग्रेसचे कर्णधार

होते तरी अलाहाबादच्या चौथ्या काँग्रेसपासूनच तिच्यावर सरकारची वक्रदृष्टि झाली. ज्या व्हाइसरॉयनें तिच्या स्थापनेला मदत केली व तिनें सामाजिक प्रश्नांची चर्चा न करतां राजकीय विषयांची करावी असें आग्रहपूर्वक सांगितलें ते लॉर्ड डफरीन १८८९ सालीं काँग्रेसला राजद्रोही म्हणूं लागले. ज्या काँग्रेसचे सेक्रेटरी ह्यूम, सल्लागार वेडरबर्न व अध्यक्ष यूल व वेब असे सर्व युरोपियन असतांना देखील काँग्रेसच्या बैठकींना सरकारी नोकरांनीं हजर राहूं नये असा हुकूम निघाला. यावरून काँग्रेसच्या कार्याची कशी प्रगति होत होती हें कळून येईल.

★ ★ ★

१८९५ सालीं पुण्याला चतुःशृंगीच्या मैदानांत काँग्रेसचें ११ वें अधिवेशन भरलें. त्या वेळीं काँग्रेसच्या मंडपांत सामाजिक परिषद भरूं देणार नाहीं असा कांहीं प्रतिनिधींनीं आग्रह धरला होता. त्यामुळें न्यायमूर्ति रानड्यांना आपली परिषद स्वतंत्र भरवावी लागली. अध्यक्ष सुरेंद्रनाथ बानर्जींचें भाषण राजकारणापेक्षां सामाजिक प्रश्नांनांच विशेष वाहिलेलें होतें. पुढील कांहीं वर्षांत देशांत रँडचा खून, दुष्काळ, दडपशाही, राजद्रोहाचे खटले, बंगालची फाळणी इत्यादि गोष्टी घडल्या. त्यामुळें त्या त्या प्रसंगीं काँग्रेसमध्यें मतप्रदर्शन करण्यांत आलें. कर्झनशाहीबद्दलहि सर्वत्र असंतोष माजला होता; त्याबद्दल नापसंती व्यक्त करण्यांत आली. कलकत्याला १९०६ सालीं अध्यक्ष दादाभाई नौरोजी यांनीं स्वराज्य शब्दाचा मंत्रोच्चार करण्यापूर्वीं काँग्रेसचें धोरण अतिशय नेमस्त, राजनिष्ठेचें व निषेध–विनंत्यांवर आधारलेलें होतें. पहिल्या २० वर्षांतील ठरावांची छाननी केली तर हिंदुस्थानच्या कारभाराची चौकशी करण्यासाठीं रॉयल कमिशनची मागणी, प्रांतिक व मध्यवर्ती

कौंसिलांत लोकनियुक्त सभासदांची संख्या वाढविण्याची विनंति, म्युनिसिपॅलिट्या व लोकलबोर्डें या संस्था लोकनियुक्त करण्याबद्दलची मागणी वगैरे गोष्टी पाहिल्या म्हणजे कॉंग्रेसची किती माफक प्रमाणांत मंदमंद प्रगति होत होती याचें प्रत्यंतर येतें. मात्र या कालावधींत देशांत सामाजिक व औद्योगिक जागृति झाली, लोक सरकाराविरुद्ध निर्भयपणें बोलूं लागले, वृत्तपत्रांच्या द्वारें जनतेच्या असंतोषाला वांचा फुटूं लागली व आपला देश परतंत्र व त्यामुळें दारिद्री असल्यामुळें आपण कांहींतरी केलें पाहिजे याची जाणीव सुबुद्ध व विचारी नागरिकांत उत्पन्न झाली. कॉंग्रेसनें केलेलें हें प्राथमिक कार्य राजकीय दृष्ट्या कमी महत्त्वाचें नाहीं.

१९०५ सालीं जाहीर झालेल्या बंगालच्या फाळणीमुळें मात्र देशांत नवचैतन्य निर्माण झालें. ह्या घटनेमुळेंच कॉंग्रेस अधिक जोरदार व तेजस्वी झाली. कॉंग्रेसमध्यें प्रतिकाराची शक्ति उत्पन्न करण्याचें कार्य लॉर्ड कर्झननें केलें. फाळणीच्या जाहीरनाम्या-मुळें बंगालमध्यें प्रचंड खळबळ उडाली. स्वदेशी, बहिष्कार, वंदे मातरम् वगैरेमुळें वातावरण भरून गेलें. त्याचे पडसाद सबंध देश-भर उठले. जनतेंत सनदशीर प्रतिकारशक्ति उत्पन्न झाली त्याप्रमाणें अत्याचारी वृत्तीचेंहि बीजारोपण झालें. बंगालच्या फाळणीप्रमाणेंच जालियनवाला बागेंतील कत्तलीमुळें हिंदी राष्ट्रांत क्रोध आणि क्षोभ उत्पन्न झाला आणि सबंध राष्ट्र चवताळून उठलें. राज्यकर्त्यांच्या असल्या अन्याय्य, अत्याचारी दुष्कृत्यांमुळें जनतेची प्रतिकारशक्ति पराकोटीला पोंचत असते, हें त्यांनीं ध्यानांत ठेवावें. जालियन-वाला प्रकरणामुळें राष्ट्रीय सभेची शक्ति कितीतरी पटीनें वाढली. ती निःशस्त्र प्रतिकारास सज्ज झाली आणि तिनें स्वातंत्र्याचा लढा पुकारला. सरकार जों जों दडपशाही करी, तों तों जनता अधिका-

धिक उत्तेजित होत असे. दडपशाहीचें होमकुंड धगधगूं लागलें तरी हिंदी राष्ट्रीय सभा नमली नाहीं. ती दुप्पट जोरानें स्वातंत्र्याचा मार्ग आक्रमूं लागली. काँग्रेसनें व बंगाल प्रांतानें बंगालच्या फाळणीविरुद्ध इतक्या जोराची चळवळ केली कीं, अखेर सरकारला ती रद्द करणें भाग पडलें. काँग्रेसच्या सामर्थ्याचा हा पहिला विजय होय असें म्हटलें तरी चालेल.

बंगालची फाळणी जाहीर झाल्यानंतर कलकत्ता येथें दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं जें अधिवेशन भरलें तें आतांपर्यंतच्या अधिवेशनांत महत्त्वाचें समजलें जाईल. या बैठकींतच दादाभाईनीं 'स्वराज्याची' सुप्रसिद्ध घोषणा केली. याच वेळेपासून ' वंदे मातरम् ' हें राष्ट्रगीत ठरून तें सर्वत्र गायिलें जाऊं लागलें. याच अधिवेशनांत स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ही चतुःसूत्री गाजली आणि बंगालबद्दल जो ठराव आला त्याबद्दल बोलतांना बिपिनचंद्र पाल म्हणाले, 'बहिष्कार हा नुसत्या मालावर घालून चालणार नाहीं, तर सरकारी संस्था व कायदेमंडळें यांवर बहिष्कार पुकारला पाहिजे. गव्हर्नरबरोबर कायदेमंडळांत सहकार्य करूं नये. ' पालबाबूंचे हे उद्गार म्हणजे म. गांधींनीं पुरस्कारलेल्या असहकारितेचाच पूर्वावतार नव्हे काय ? कलकत्ता काँग्रेसनंतर सुरतेची काँग्रेस झाली; पण तिचा कसा व कां बखेडा झाला हें मागें घटनेच्या इतिहासांत निवेदन केलेंच आहे.

१९०८ पासून १९१६ पर्यंतच्या अधिवेशनांत केवळ नेमस्तांचेंच राज्य होतें. सुरतेस दुफळी झाल्यावर लो. टिळक प्रभृति जहाल काँग्रेसमधून बाहेर पडले व पुढें लवकरच लोकमान्यांना सहा वर्षांची शिक्षा झाल्यामुळें जहाल पुढाऱ्यांच्या अभावीं काँग्रेसचा वारसा नेमस्तांच्याचकडे यावा हें क्रमप्राप्तच


होतें. या आठ वर्षांच्या अवधींत जे अध्यक्ष झाले त्यांची नामावळी पाहिली म्हणजे या बैठकींतून कोणत्या स्वरूपाचे ठराव झाले असतील याची कल्पना येईल. डॉ. राशबिहारी घोष, वेडरबर्न, पं. बिशन नारायण धार, मुधोळकर, नबाब सय्यद महंमद बहादुर, भूपेंद्रनाथ बसु, सत्येंद्रप्रसन्न सिंह इत्यादिकांची अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. इतकेंच काय, १९१२ सालीं रॅम्से मॅक्डोनल्ड यांचें नांव कलकत्त्याच्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून नियुक्त झालें होतें. पण ते आयत्या वेळीं येऊं शकले नाहींत म्हणून पं. बिशन नारायण धार यांची योजना झाली. या मधल्या आठ वर्षांच्या काळांत काय घडलें याचें थोडक्यांत वर्णन डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांनीं आपल्या इतिहासांत पुढीलप्रमाणें केलें आहे : " १९०८ ते १९१५ या अवधींत कॉंग्रेस पूर्णपणें नेमस्तांच्या आहारीं गेली होती. त्यांनीं पुन्हां राजनिष्ठा व्यक्त करण्याचें, सरकारकडे अर्जविनंत्या करण्याचें, ब्रिटिश लोकांचा अनुनय करण्याचें व हिंदी नोकरशाहीचा निषेध करण्याचें आपलें राजकारण सुरू केलें. राष्ट्रवादी पुढाऱ्यांच्या मागें सरकारचा ससेमिरा लागला होता. १९०८ सालीं टिळकांना तुरुंगवास घडला असतां सर्व नेमस्त सरकारला जाऊन मिळाले. टिळक सुटल्यानंतर त्यांनीं हिंदुस्थानचीं गाऱ्हाणीं व हिंदी स्वराज्याची मागणी वेशीवर टांगण्यासाठीं होमरूलची चळवळ सुरू केली. या वेळेपर्यंत केवळ थिऑसाफिस्ट असलेल्या व राजकारणापासून अलिप्त असलेल्या मिसेस ॲनी बेझंट यांनीं एकदम राजकारणाच्या आखाड्यांत उडी घेतली व होमरूलसाठीं प्रचंड चळवळीची धुरा हातीं घेतली. होमरूल ही त्या वेळीं नवी घोषणा सुरू करण्यांत आली होती. १९१५, १९१६ व १९१७ हीं तीन वर्षें राष्ट्रीय जागृतीच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचीं

गेलीं. त्या वेळीं होमरूल हीच काँग्रेसच्या लढ्याची घोषणा होती. ''

लखनौ काँग्रेसमध्यें जहाल व मवाळ पक्षाचें एकीकरण झालें. लो. टिळकांनीं पुढाकार घेऊन हिंदुमुसलमानांचें ऐक्य करणारा सुप्रसिद्ध ' लखनौ करार ' घडवून आणला. १९१८ सालीं पहिलें युद्ध समाप्त झालें, पण वटहुकुमांचा अंमल तसाच चालू राहिला. या जुलमी कायद्याच्या निषेधार्थ जी चळवळ सुरू झाली तिचें नेतृत्व महात्मा गांधींनीं घेतलें व सत्याग्रह हें नवें तत्त्व हिंदी राजकारणांत आणलें. १९१९ सालीं जालियनवाला बाग प्रकरणामुळें अमृतसरची काँग्रेस गाजली, पण १९२० सालीं कलकत्ता येथें भरलेल्या जादा अधिवेशनापासून काँग्रेसच्या इति-



अमृतसर : १९१९




ऑगस्ट : १९२०

हासांत अभूतपूर्व असा नवा कालखंड सुरू झाला. या बैठकींत सरकारी पदव्या, शाळा, कॉलेजें, कोर्ट, कायदेमंडळें व सरकारी नोकऱ्या यांवर बाहिष्कार घालून सरकारशीं असहकारिता पुकारण्याचा ठराव मंजूर झाला. कॉंग्रेसमधील कौन्सिलवाद्यांना या ठरावाचा लवकरच वीट आला व गयेच्या अधिवेशनांत देशबंधु दास यांच्या अध्यक्षतेखालीं कॉंग्रेसनें कायदेमंडळांत प्रवेश करण्याला मंजुरी दिली. कौन्सिलवाद्यांचें हें राजकारण १९२९ पर्यंत जवळ जवळ चालू होतें. मध्यंतरीं भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड यांच्या आव्हानाला उत्तर म्हणून पं. मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखालीं

एक घटना—कमिटी नेमण्यांत आली. या कमिटीनें हिंदुस्थानची भावी राज्यघटना पद्धतशीरपणें तयार केली होती; पण तिचें ध्येय वसाहतींचें स्वराज्य एवढेंच मर्यादित होतें. त्यामुळें हा नेहरू रिपोर्ट जरी कलकत्ता काँग्रेसनें १९२८ सालीं मंजूर केला तरी पुढील लाहोर अधिवेशनांत रावी नदीच्या कांठीं त्याला जलसमाधि देण्यांत आली. कारण जागृत झालेला तरुण भारत संपूर्ण स्वातंत्र्यापेक्षां दुसऱ्या कोणत्याहि कनिष्ठ प्रतीच्या ध्येयानें संतुष्ट होणार नव्हता. पं. जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखालीं लाहोर येथें भरलेलें अधिवेशन मोठें महत्त्वपूर्ण झालें. त्यांत 'संपूर्ण



नागपूर : १९२०



बार्डोली : १९२८

स्वराज्य ' हें कॉंग्रेसचें उद्दिष्ट म्हणून घोषित करण्यांत आलें आणि स्वातंत्र्यासाठीं गांधीजींच्या नेतृत्वाखालीं देशभर सामुदायिक चळवळ करावी असें ठरलें. कलकत्ता कॉंग्रेसनें हिंदी स्वराज्यघटना मंजूर करून ब्रिटिश सरकारला एक प्रकारचा निर्वाणीचा आदेशच दिला; पण सरकारनें तो झिडकारल्यामुळें लाहोर कॉंग्रेसनें ता. ३१ डिसेंबर १९२९ रोजीं रात्रौ १२ वाजतां संपूर्ण स्वातंत्र्याची ध्वजा उभारली. या स्वातंत्र्यगर्जनेचें पर्यवसान जगाचे डोळे दिपविणाऱ्या व राज्यकर्त्यांचे डोळे उघडणाऱ्या सार्वत्रिक सत्याग्रहाच्या चळवळींत झालें.



लाहोर काँग्रेस

३१ डिसेंबर : १९२९

लाहोर काँग्रेस खळबळीच्या व क्षोभाच्या वातावरणांत भरली. म. गांधी प्रभृति पुढाऱ्यांनीं शेवटचा प्रयत्न म्हणून व्हाइसरॉयांची मुलाखत घेतली, पण ती निष्फळ ठरली; भगतसिंग—दत्तानीं असेंब्लींत बाँब टाकले; जतींद्रदासानें प्रायोपवेशन करून आपले प्राण वेंचले; लाहोरला सॉंडर्सचा खून झाला; व्हाइसरॉयांच्या गाडीवर बाँब टाकण्यांत आला, या घटनांमुळें लाहोर काँग्रेसवर प्रक्षोभाची दाट छाया पडली होती. तथापि अध्यक्ष पं. जवाहरलाल यांचें मोठ्या थाटानें स्वागत करण्यांत आलें. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत जागतिक प्रश्नांची मीमांसा करून हिंदी राजकारणाच्या




दांडी–यात्रा : १९३०

लढ्याला आर्थिक अधिष्ठान पाहिजे असें प्रतिपादन केलें. ' आज समाजवादाचें तत्त्वज्ञान हळूंहळूं जगाला व्यापीत चाललें आहे. त्याचा अवलंब केल्याशिवाय हिंदी राष्ट्राचा उद्धार होणार नाहीं ' अशा आशयाचे उद्गार त्यांनीं काढले.

लाहोर कॉंग्रेसमध्यें स्वातंत्र्याचा ठराव पास झाल्यावर २६ जानेवारीला सबंध देशभर स्वातंत्र्यदिन साजरा झाला. गांधींनीं दूरदृष्टीनें सर्व विचार करून मिठाच्या कायदेभंगाचा कार्यक्रम प्रथम हातीं घेण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें ता. २ मार्च १९३० रोजीं त्यांनीं व्हाइसरॉयांना निर्वाणीचा खलिता पाठविला. त्याचा उप-

योग न झाल्यामुळें गांधींनीं ६ एप्रिल रोजीं दांडी येथें कायदेभंग करून सत्याग्रहाच्या चळवळीचा श्रीगणेशा केला. महात्माजींच्या चैतन्यमय व स्फूर्तिप्रेरक उदाहरणानें सर्व देश खडबडून जागा झाला व सर्वत्र कायदेभंगाची लाट उसळली. या चळवळींत शेंकडों पुढारी व हजारों अनुयायी तुरुंगांत गेले. सुमारें ८८ हजार लोकांनीं स्वखुषीनें तुरुंगवास ओढवून घेतला. सरकारनेंहि कमी प्रतिक्रिया केली असें नाहीं. दडपशाही, जुलूम, लाठीमार, गोळीबार, जप्त्या, वटहुकूम इत्यादि अनेक साधनें सरकारनें वापरलीं. अखेर ता. ५ मार्च १९३१ रोजीं गांधीं-आयर्विन समेट होऊन कायदेभंगाच्या चळवळीचें क्रांतिपर्व समाप्त झालें.



गोलमेज परिषद, लंडन : १९३१

त्यानंतर लागलींच एक महिन्याच्या अवधींत कराचीला काँग्रेसचें आधिवेशन भरलें. बैठकीच्या आदल्या दिवशींच भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना फांशी देण्यांत आलें व कानपूरच्या दंग्यांत गणेश शंकर विद्यार्थी बळी पडले. कराची काँग्रेस विजयाची होती तरी या गोष्टींमुळें तिच्यावर विषण्णतेची छाया पसरली. या अधिवेशनांत मूलभूत हक्कासंबंधींचा अत्यंत महत्त्वाचा ठराव झाला. अध्यक्ष सरदार वल्लभभाई पटेल यांचें भाषण व्यावहारिक स्वरूपाचें होतें.

कराचीनंतर साडेतीन वर्षांनीं १९३४ सालीं मुंबई येथें वरळीच्या मैदानावर काँग्रेसचें ४७ वें अधिवेशन भरलें. या मधल्या काळांत किती तरी गोष्टी घडल्या. गांधीजी लंडनला गोलमेज परिषदेला जाऊन आले. १९३२ च्या जानेवारींत स्वातंत्र्याच्या चळवळीचें दुसरें मन्वंतर सुरू झालें. या चळवळीचा प्रतिकार करण्यासाठीं सरकारनें आपलीं सर्व आयुधें बाहेर काढलीं. शेंकडों, हजारों लोकांना तुरुंगवास घडला. चळवळीच्या ऐन रणधुमाळींतच दिल्ली व कलकत्ता येथें काँग्रेसचीं धांवतीं अधिवेशनें भरलीं. १९३४ सालीं कायदेभंग तहकूब करण्यांत आला व कौन्सिलांचा कार्यक्रम हातीं घेण्याचें ठरविण्यांत आलें. मुंबईच्या काँग्रेस नगराला 'अब्दुल गफार नगर' असें नांव देण्यांत आलें होतें. कराची काँग्रेसप्रमाणें मुख्य बैठकीच्या जागेवर उघडा मंडप घातला होता. वर आकाशाचें छत, सभोंवतीं कनाती व सर्वत्र विद्युद्दीपांचा लखलखाट अशा थाटांत हें अधिवेशन भरलें. या अधिवेशनांत अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाची स्थापना करण्यांत आली. गांधीजींनीं काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा आपला निश्चय याच अधिवेशनांत जाहीर केला व चार आणेवाल्या सभासदत्वाचा त्यांनीं राजीनामा दिला. अध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद यांनीं आपल्या भाषणांत गेल्या तीन वर्षांतील

राजकीय पारीस्थितीचें सिंहावलोकन करून सत्याग्रहाच्या तत्त्वाचें श्रद्धायुक्त समर्थन केलें. या बैठकींत काँग्रेसच्या प्रातिनिधींची संख्या ६ हजारांवरून २ हजारांवर आणली व खादी आणि ग्रामोद्योग यांवर विशेष भर देण्यांत आला, विधायक व सनदशीर कार्यक्रमाच्या दृष्टीनें मुंबई कॉंग्रेसच्या अधिवेशनापासून नवीन कालखंडाला सुरुवात झाली असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

★ ★ ★

१९३४ ची काँग्रेसची बैठक काँग्रेसच्या मुक्ततेनंतर अधिकृतपणें ४४ महिन्यांनंतर भरली तर १९३६ चें लखनौचें अधिवेशन १८ महिन्यांनंतर भरण्याचा योग आला. या दीड वर्षाच्या अवधींत स्वदेशापेक्षां परदेशांत फार मोठ्या घडामोडी झाल्या, कीं ज्यांच्यामुळें दुसऱ्या महायुद्धाचें बीज पेरलें गेलें. या कालावधींत इटलीनें ॲबिसीनियावर आक्रमण केलें तर जपाननें चीनवर हल्ला चढविला. हिटलरनें ऱ्हाइनलँडचा टापू घेतला आणि स्पेनमध्यें क्रांति होऊन साम्यवादी पक्ष बलवान झाला. युरोपांत या सगळ्या घडामोडी घडत असतांना राष्ट्रसंघ कांहीं करूं शकत नाहीं, हें पुन्हां एकदां सिद्ध झालें. या कालांत हिंदुस्थानांत काँग्रेसचें राजकारण कायदेमंडळापुरतेंच मर्यादित राहिलें. काँग्रेसनें व राष्ट्रीय पक्षानें ऐक्य करून सरकारचे पराभव केले; पण त्यायोगें विशेष कांहीं साधलें नाहीं. १९३५ सालीं २८ डिसेंबर रोजीं काँग्रेसला ५० वर्षें पूर्ण झालीं म्हणून सर्वत्र सुवर्णमहोत्सव साजरे झाले. या प्रसंगानिमित्त डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांनीं काँग्रेसचा अधिकृत इतिहास प्रसिद्ध केला. लखनौ काँग्रेसच्या आधीं सहा महिने पत्नीच्या शुश्रूषेसाठीं पं. जवाहरलाल नेहरूंची मुक्तता झाली होती व ते परदेशांतच होते. पुढें सौ.

कमला नेहरू कालवश झाल्यानंतर ते हिंदुस्थानांत परत आले. पण तत्पूर्वीच राष्ट्राध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली होती. लाहोर काँग्रेसनंतर ६ वर्षांनीं पं. जवाहरलाल पुन्हां राष्ट्रपति झाले तर लखनौला २० वर्षांनीं काँग्रेस भरण्याचा योग आला. १९१६ सालीं लो. टिळकांनीं लखनौ येथें महत्त्वाचा भाग घेऊन हिंदुमुसलमानांची तडजोड घडवून आणली होती. त्यामुळें लखनौ या शहराला एक प्रकारचें राजकीय महत्त्व प्राप्त झालें होतें. अशा या महत्त्वाच्या शहरांत पं. जवाहरलाल यांच्या नेतृत्वाखालीं काँग्रेसचें ४९ वें अधिवेशन भरलें आणि १९१६ सालीं ज्याप्रमाणें लो. टिळकांनीं लखनौचें अधिवेशन गाजविलें त्याप्रमाणें १९३६ सालीं समाजवादी जहालांनीं हें अधिवेशन हालवून सोडलें.

काँग्रेसनें कायदेमंडळांत पाऊल टाकलें असलें तरी अधिकार-स्वीकार करूं नये असा ठराव या बैठकींत प्रचंड बहुमतानें पसार झाला. पं. जवाहरलाल पाश्चात्य देशांत हिंडून नवे विचार व नव्या कल्पना आत्मसात् करून आले होते व साम्यवादाशिवाय हिंदुस्थानचा प्रश्न सुटणार नाहीं असें त्यांनीं निश्चित निदान केलें होतें. त्यांच्या या विचारसरणीशीं सहमत असलेले आचार्य नरेंद्रदेव, संपूर्णानंद, अच्युतराव पटवर्धन वगैरेंनीं त्यांना दुजोरा दिल्यामुळें लखनौ काँग्रेसमध्यें साम्यवादाचा विजय झाला. शेतकरी संघटना व बहुजनसमाजाशीं संपर्क वाढविणें या दोन महत्त्वाच्या ठरावांशिवाय सुभाष बोस यांच्या अटकेचा निषेध, साम्राज्यवादी युद्धांत भाग घेण्याच्या बाबतींत विरोध, ॲबिसीनियाबद्दल सहानुभूति, प्रांतिक निवडणुकी लढविणें, अखिल भारतीय शेतकरी संघटना—समिति स्थापन करणें इत्यादि ठराव



१९३७-३८-३९

मंजूर झाले. या बैठकींत अच्युतराव पटवर्धन व शंकरराव देव या दोघां महाराष्ट्रीय पुढाऱ्यांना काँग्रेस वर्किंग कमिटींत घेण्यांत आलें. यापूर्वी न. चिं. केळकर हे कांहीं वर्षें वर्किंग कमिटीचे सभासद होते.

लखनौ काँग्रेसनंतर आठच महिन्यांनीं खानदेशांत फैजपूर येथें काँग्रेसचें ५० वें अधिवेशन भरलें. खुद्द महाराष्ट्रांत भरलेलें हें काँग्रेसचें दुसरें अधिवेशन होय. यापूर्वीचें ४१ वर्षांपूर्वी १८९५ सालीं पुणें येथें भरलें होतें.

फैजपूर हें तालुक्याचें गांव खानदेशांत भुसावळजवळ आहे. तेथें खेड्यांतल्या पहिल्या काँग्रेसचें अधिवेशन भरलें व खेड्यांत काँग्रेस भरविण्याचा पहिला मान महाराष्ट्राला मिळाला. सुशि-क्षित नागर जनतेपेक्षां अशिक्षित, खेडवळ अडाणी जनतेपर्यंत

राष्ट्रीय सभेचा संदेश पोंचविला जावयाचा असेल तर काँग्रेसचीं अधिवेशनें शहरांत न भरवतां खेड्यांतच भरविलीं पाहिजेत, असें गांधीजींचें म्हणणें असल्यामुळें महाराष्ट्रानें खेड्यांतल्या काँग्रेसचा पहिला प्रयोग केला आणि तो कल्पनेबाहेर यशस्वी झाला. मात्र त्यासाठीं कार्यकर्त्यांना अनेक अडचणींना तोंड देऊन अपरिमित परिश्रम करावे लागले. काँग्रेससाठीं फैजपूर येथें टिळकनगर उभारलें होतें. या नगरांत कळकांचें साम्राज्य सर्वत्र पसरलें होतें. जणूं काय तें बांबूंचें शहर बनलें होतें. दरवाजेहि वेळूचेच बनविले होते आणि त्यांची रचना बंगालचे सुप्रसिद्ध कलावंत नंदलाल बोस यांनीं मोठ्या कलापूर्णतेनें केली होती. अशा प्रकारें नाविन्यानें नटलेलें हें ' वेणुग्राम ' काँग्रेसच्या आजपर्यंतच्या इतिहासांत तरी अपूर्व असें होतें. येथील ग्रामोद्योग–प्रदर्शनहि पहिलेंच होतें. या अधिवेशनासाठीं जो झेंडाचौक उभारला होता तो एक लाख लोक मावतील एवढा प्रचंड होता. आणि झेंडा १२० फूट उंचीच्या स्तंभावर फडकत होता. फैजपूरचें हें अधिवेशन महाराष्ट्रांत व हिंदुस्थानांत चांगलेंच गाजलें.

फैजपूरचें अधिवेशन हें अनेक दृष्टींनीं अपूर्व होतें. या अधिवेशनांत तीन वेळां अध्यक्ष झालेल्या पं. जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखालीं प्रांतिक निवडणुकांचें रणशिंग फुंकलें गेलें व त्याला महात्मा गांधींचा आशीर्वाद मिळाला. या अधिवेशनांत पं. मालवीय, लोकनायक अणे, भाई मानवेंद्रनाथ रॉय व म. गांधी यांनीं भाषणें करून अधिवेशन यशस्वी केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. पं. जवाहरलाल नेहरूंचें अध्यक्षीय भाषण म्हणजे आंतरराष्ट्रीय दृष्टीनें केलेला हिंदी स्वातंत्र्याच्या प्रश्नाचा विचार असें म्हणणें अधिक युक्त होईल. त्यांचें भाषण

उत्तुंग ध्येयवादी असलें तरी त्यांत व्यवहारदृष्टीहि भरपूर असल्याचा अनुभव आला. घटना–परिषद, जातीय निर्णय, खादी–ग्रामोद्योग, संस्थानी प्रजेचा प्रश्न, युद्धविरोध, साम्राज्यविरोध वगैरे विविध प्रश्नांचा त्यांनीं परामर्श घेतला. हिंदुस्थान हा जागतिक संग्रामांतील एक घटक आहे. या दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें पाहिजे त्याचप्रमाणें हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्याचा अंतर्गत दृष्टीनें विचार केला पाहिजे, असें जवाहरलाल यांच्या भाषणावरून दिसून येतें. म. गांधी ग्रामोद्योग–प्रदर्शनाच्या निमित्तानें फैजपूरला हजर राहिले व खादी, अस्पृश्यता–निवारण, जातीय ऐक्य व अहिंसा या चार गोष्टींवर त्यांनीं भर दिला. आपद्धर्म म्हणून काँग्रेसनें कायदेमंडळांत जाण्यास त्यांनीं संमति दिली.

या बैठकींत निवडणुकीसंबंधीं व अधिकारस्वीकार करावा कीं नाहीं यासंबंधीं बरीच खडाजंगी झाली. लखनौप्रमाणेंच येथेंहि दोन तट दिसून आले. पण अधिकारस्वीकाराचा प्रश्न ऑ. इं. काँ. कमिटीचे सभासद व कायदेमंडळांत निवडून आलेले सभासद यांच्या जोड बैठकींत घेण्याचें ठरल्यामुळें या अधिवेशनांत तो तहकूब करण्यांत आला. परदेशांतील परिस्थितीसंबंधीं मात्र नेहेमींपेक्षां अधिक ठराव झाले. युद्ध नष्ट करण्यासाठीं साम्राज्यशाहीचा नायनाट होणें जरूर आहे, ब्रह्मदेश अलग करण्याची सरकारी योजना ब्रह्मी लोकांना नापसंत आहे, स्पेनबद्दल काँग्रेसला संपूर्णपणें सहानुभूति वाटते वगैरेबद्दलचे ठराव या बैठकींत संमत झाल्यामुळें फैजपूर काँग्रेसला आंतरराष्ट्रीय स्वरूप आलें होतें असें म्हटल्यास हरकत नाहीं.

१९३६ च्या फैजपूर काँग्रेसनंतर एकदम १९३८ च्या मार्च महिन्यांत गुजराथेंत हरिपुरा येथें राष्ट्रीय सभेचें ५१ वें अधि-

वेशन भरलें. मध्यंतरीं १९३७ सालीं कॉँग्रेसची बैठक झाली नाहीं. या ५१ व्या अधिवेशनाचें अध्यक्षपद बाबू सुभाषचंद्र बोस यांनीं मंडित केलें होतें. ऑल इंडिया कॉँग्रेस कमिटी-कडून सुभाषबाबूंची जेव्हां निवड झाली तेव्हां ते युरोपमध्यें प्रकृतीस्वास्थ्यासाठीं गेले होते. त्यांच्या नेतृत्वाखालीं हरि-पुऱ्याची कॉँग्रेस विशेष संस्मरणीय अशी झाली. कारण फैजपूर कॉँग्रेसनें निवडणुकींत भाग घेण्याचा आदेश दिल्यामुळें व पुढें १९३७ च्या मार्चमध्यें ऑल इंडिया कॉँग्रेस कमिटीनें अधिकार-स्वीकाराला मान्यता दिल्यामुळें मुंबई, मद्रास, संयुक्त प्रांत, मध्य-प्रांत, बिहार व ओरिसा या सहा प्रांतांत कॉँग्रेस–मंत्रिमंडळें स्थापन झालीं होतीं. या लोकपक्षीय मंत्रिमंडळांनीं दारूबंदी, कर्ज–निवारण, कामगारांचे हक्क, मंदिर–प्रवेश वगैरेसंबंधीं विविध कायदे करून आपली लोकहिततत्परता जनतेच्या निदर्शनास आणली होती. पण १९३८ च्या कॉँग्रेस अधिवेशनाच्या सुमा-रासच बिहार व संयुक्त प्रांत या प्रांतांचीं मंत्रिमंडळें व गव्हर्नर यांच्यांत राजबंद्यांच्या सुटकेबद्दल मतभेद होऊन स्वाभिमानासाठीं कॉँग्रेस–मंत्र्यांनीं राजीनामे दिले होते. देशांत कॉँग्रेस–मंत्रिमंडळें अधिकारारूढ होऊन पुरतें एक वर्षहि लोटलें नव्हतें तोंच कॉँग्रेस मंत्र्यांना राजीनामा देण्याचा प्रसंग आला. ही घटना घटनात्मक दृष्टीनें जितकी गंभीर स्वरूपाची होती तितकीच राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाची होती. त्यामुळें हरिपुरा कॉँग्रेसच्या अधिवेशनाचें वाता-वरण या घटनात्मक पेंचप्रसंगाच्या छायेमुळें अधिकच प्रक्षोभक होऊन गेलें होतें. पुढें काय होणार याबद्दल प्रत्येकाच्या अंतः-करणांत खळबळ माजली होती. अशा वातावरणांत हरिपुरा कॉँग्रेस भरली व तिनें आपल्या तेजस्वी धोरणाचें जोरदार समर्थन

करून सरकारला माघार घ्यावयास लावलें. फेडरेशनचा धिक्कार वगैरे अनेक ठरावांमुळें काँग्रेसनें सरकारला व जनतेला आपल्या शक्तीचा प्रत्यय आणून दिला.

सुरतेजवळ तापी नदीच्या कांठीं हरिपुरा या खेड्यांत काँग्रेसच्या अधिवेशनासाठीं विठ्ठलनगर उभारण्यांत आलें होतें. फैजपूरनंतर खेड्यांत भरणारें हें दुसरें अधिवेशन होय. हें अधिवेशन खेड्याच्या गांवीं भरलें तरी त्याचें ऐश्वर्य शहरापेक्षांहि अधिक होतें. ७–८ लाख रुपये खर्च करून त्याला मायानगरीचें वैभव आणलें होतें. या बैठकीला एकंदर तीन लाख लोक जमले असतांहि कोणाची गैरव्यवस्था झाली नाहीं. प्रचंडता, भव्यता, अपूर्वता हें हारिपुरा काँग्रेसचें वैशिष्ट्य म्हणून सांगतां येईल.

हरिपुरा येथील काँग्रेसचें अधिवेशन ५१ वें असल्यामुळें स्वागतमंडळानें विठ्ठलनगराला ५१ दरवाजे केले होते, मंडपांत ५१ राष्ट्रीय निशाणें फडकत ठेवलीं होतीं, अध्यक्षांच्या मिरवणुकीच्या रथाला ५१ बैल जुंपले होते व एकंदर अधिवेशनांत ५१ राष्ट्रगीतें गाण्याचें ठरलें होतें. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष दरबार गोपाळदास हे होते. अध्यक्ष बाबू सुभाषचंद्र बोस यांनीं आपल्या भाषणांत फेडरल घटनेला विरोध, सामुदायिक कायदेभंगाचा पुरस्कार, राष्ट्रीय स्वयंसैनिकांची संघटना, समाजवाद, शेतकरी–कामकरी व संस्थानी प्रजा यांचे प्रश्न, परराष्ट्रांतील चळवळ, रोमन लिपीला पाठिंबा, वगैरे विविध गोष्टींचा परामर्ष घेतला व काँग्रेसनें डी व्हॅलेरा यांचें धोरण डोळ्यांपुढें ठेवावें अशी शिफारस केली. या अधिवेशनांत युरोपांतील आगामी महायुद्धासंबंधीं इषारा देणारा व युद्धाला स्पष्टपणें विरोध दर्शविणारा ठराव मोठ्या बहुमतानें मंजूर झाला. त्याशिवाय राष्ट्रीय शिक्षणासाठीं

' अखिल भारतीय शिक्षणसंस्था ' स्थापन करणें, संस्थानी प्रजेला आश्वासन देणें, आसामच्या राणी गुडालोच्या सुटकेची मागणी, परदेशांतील हिंदी लोक, आगामी युद्धाची शक्यता वगैरे अनेक ठराव या अधिवेशनांत पसार झाले. हरिपुरा काँग्रेसच्या अधिवेशनाचा संदेश सुभाषबाबूंच्या शब्दांत पुढीलप्रमाणें सांगतां येईल: " आपण संघटित झालें पाहिजे. आपण अद्याप संघटित झालों नाहीं. शिस्त आपल्यांत आली नाहीं. हे गुण जर आपल्यांत आले तर हिंदुस्थान स्वतंत्र झाल्याशिवाय रहाणार नाहीं. "

काँग्रेसचें पुढचें अधिवेशन मध्यप्रांतांत १० मार्च १९३८ रोजीं जबलपुरानजीक त्रिपुरी येथें भरलें. काँग्रेसच्या साठ वर्षांच्या इतिहासांत हें ५२ वें अधिवेशन सुरत काँग्रेसप्रमाणें संस्मरणीय ठरल्यावांचून रहाणार नाहीं. सुरतेप्रमाणेंच त्रिपुरीलाहि अध्यक्षाच्या निवडणुकीपासूनच दुफळीला सुरुवात झाली. पण सुरतेला काँग्रेसच्या बैठकीला प्रारंभ होतो न होतो तोंच बखेडा माजून मारामारींत व गोंधळांत तें अधिवेशन विसर्जन पावलें. त्रिपुरीला तसें जरी झालें नाहीं तरी नियोजित अध्यक्षांचें आजारीपण, वर्किंग कमिटीच्या सभासदांचे राजीनामे व त्यांनीं घेतलेली भूमिका, महात्मा गांधींची विषण्णता व राजकोटचा उपवास, सोशॅलिस्टांनीं केलेला अवसानघात आणि यांशिवाय काँग्रेसमध्यें सुभाषबाबूंनीं उत्पन्न केलेले जहाल आणि मवाळ असे दोन सवते सुभे यामुळें त्रिपुरी काँग्रेसचें अधिवेशन विषादपूर्ण व खेदजनक झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. हरिपुरा काँग्रेसमध्यें जे सुभाषबाबू उत्सवमूर्ति होते, सर्वांच्या आदराचे व प्रेमाचे

विषय झाले होते तेच सुभाषबाबू पुढच्या वर्षीं त्रिपुरीच्या काँग्रेसमध्यें विसर्जनमूर्ति ठरले.

हरिपुरा काँग्रेसच्या वेळीं संयुक्तप्रांत व बिहार या प्रांताच्या मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिल्यामुळें तेथें पेंचप्रसंग उद्भवला होता. तो काँग्रेसनंतर म. गांधी व व्हाइसरॉय यांच्यांतील पत्रव्यवहारामुळें सुटला व पुन्हां तीं मंत्रिमंडळें अधिकारारूढ झालीं. हा पेंचप्रसंग सुटतो न सुटतो तोंच मध्यप्रांतांत डॉ. खरे यांनीं राजीनामा देऊन काँग्रेस वर्किंग कमिटीला किंवा पार्लमेंटरी बोर्डाला न विचारतांच नवीन मंत्रिमंडळ स्थापन केलें. डॉ. खऱ्यांच्या या कृत्यामुळें त्यांचा निषेध करण्यांत आला व काँग्रेसमधून त्यांची हकालपट्टी झाली. डॉ. खऱ्यांच्या जागीं पं. रविशंकर शुक्ल यांनीं मुख्य प्रधानकीचीं सूत्रें हातीं घेतलीं. युरोपांत त्याच सुमारास जो म्युनिच करार घडून आला त्याबद्दल काँग्रेसनें निषेधाचा ठराव करून आपली युद्धविरोधाची भूमिका पुन्हां एकदां निःसंदिग्धपणें प्रस्थापित केली. गांधीजींचा सरहद्द प्रांतांतील दौरा, राष्ट्रीय नियोजन–समिति, प्रांतिक मंत्र्यांची दिल्लीची परिषद वगैरे विविध घटना या वर्षांत घडल्या तरी त्रिपुरी काँग्रेसपूर्वीं अध्यक्षांच्या निवडणुकीसंबंधीं जें वादळ माजलें त्याचा या ठिकाणीं अवश्य उल्लेख केला पाहिजे.

त्रिपुरी काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठीं पहिल्याप्रथम तीन नांवें पुढें आलीं. मौ. आझाद, सुभाषचंद्र बोस व डॉ. पट्टाभिसीतारामय्या. मौलानांनीं प्रकृतीच्या कारणासाठीं प्रारंभींच आपलें नांव मागें घेतलें व लोकांनीं डॉ. पट्टाभींना निवडून द्यावें असें पत्रक प्रसिद्ध केलें. आतांपर्यंत काँग्रेसच्या अध्यक्षांची निवडणूक बहुतांशीं एकमतानें व बिनविरोध होत असते. त्या प्रथेला अनु-

सरून एकदां अध्यक्ष झालेले सुभाषबाबू निवडणुकींतून माघार घेतील व डॉ. पट्टाभींना संधि देतील अशी अपेक्षा होती. महात्मा गांधींनीं पट्टाभींनाच आपल्या मताचा कौल दिला होता. अशा परिस्थितींत सुभाषबाबूंनीं आपलें नांव परत घेणें हें केव्हांहि उचित दिसलें असतें. पण सुभाषचंद्र बोस हे पडले बंडखोर, बंडखोरीचें रक्त त्यांच्या नसानसांतून वहात असल्यामुळें लोकशाहीच्या तत्त्वासाठीं व कॉंग्रेसमध्यें फेडरेशनविरोधी जहाल मत प्रभावी करण्यासाठीं त्यांनीं ही निवडणूक लढविण्याचें ठरविलें. दोघांपैकीं एका उमेदवाराला मौलानांचा व वर्किंग कमिटीच्या इतर सहा सभासदांचा जाहीर पाठिंबा होता व महात्मा गांधींनीं त्याच्यासाठीं जणूं काय आपलें सर्वस्व पणाला लावलें होतें. हा उमेदवार म्हणजे कॉंग्रेस महाभारताचे व्यासमहर्षि डॉ. पट्टाभि-सीतारामय्या होत, हें सांगणें नकोच. या निवडणुकींत सुभाष-बाबूंना १५८० व डॉ. पट्टाभींना १३७७ मतें पडून सुभाष-चंद्र बोस बहुमतानें दुसऱ्यांदा कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. डॉ. पट्टाभींचा पराभव हा आपला पराभव आहे असें गांधीजींनीं ‘ हरिजन ’ मध्यें लिहिलें आणि अधिवेशनाच्या ऐन वेळीं आझाद, सरदार पटेल, जवाहरलाल, राजेंद्रबाबू प्रभृति वर्किंग कमिटीच्या सभासदांनीं सुभाषबाबूंची अडवणूक होऊं नये म्हणून राजीनामे दिले. शिवाय सुभाषबाबू त्याच वेळीं इतके आजारी पडले कीं, त्यांना अंथरुणांतून उठतांहि येईना. त्यांचा ताप वाढत चालला व ते इतके क्षीण झाले कीं, अध्यक्षपदाची जबाबदारी ते कसे काय पार पाडतात याबद्दल सर्वत्र साशंकतेचें वातावरण निर्माण झालें. अशा या बिकट पेंचप्रसंगामुळें दुसरा कोणीहि गडबडला असता, पण सुभाष बोस यांना १०३° ताप

असतांहि त्यांनीं अध्यक्षपद स्वीकारलें आणि प्रमुख कॉंग्रेस पुढाऱ्यांचा विरोध असतांहि अधिवेशन पार पाडलें.

सुभाषबाबूंना पूर्ण मतस्वातंत्र्य देण्यासाठीं आझाद–पटेल प्रभृति कॉंग्रेसश्रेष्ठींनीं राजीनामे दिले होते, पण प्रत्यक्ष अधिवेशनांत सुभाषबाबूंना ज्या सोशॅलिस्ट–रॉयिस्ट प्रभृति जहालांच्या पाठिंब्याची आशा होती ते आयत्या वेळीं बारगळले, त्यामुळें कॉंग्रेसच्या भर अधिवेशनांत उजवे व डावे या दोहोंचा समन्वय साधणारा ठराव आणल्यावांचून गत्यंतर नव्हतें. गोविंद वल्लभ पंत यांनीं जो प्रमुख ठराव मांडला त्यामुळें कॉंग्रेस, गांधीजी, वर्किंग कमिटी व सुभाष बोस या चौघांचाहि बोज राहिला व अधिवेशन सुरळितपणें पार पडलें. एका दृष्टीनें हा ठराव अध्यक्षांना थोडा मानहानिकारक होता, त्यांच्या मतस्वातंत्र्याची गळचेपी करणारा होता. पण ज्या लोकशाही तत्त्वाच्या हिरीरीनें सुभाषबाबूंनीं अध्यक्षपदाची निवडणूक लढविली त्यांना बहुमतानें मंजूर झालेला ठराव मान्य करणेंच भाग होतें. या ठरावामुळें देशाचा गांधीजींवर जसा विश्वास प्रकट झाला तसा सुभाषबाबूंवरहि झाला. राष्ट्राला दोघांचीहि जरूरी आहे असें त्यावरून सिद्ध झालें.

सुभाषबाबूंनीं गांधीजींच्या संमतीनेंच आपली वर्किंग कमिटी निवडावी, असा पंतांनीं ठराव मांडला व तो मंजूरहि झाला. कारण बोसबाबूंना ज्या डाव्या गटवाल्या सोशॅलिस्टांच्या पाठिंब्याची आशा होती त्या गटानें आयत्या वेळीं त्यांना तोंडघशीं पाडलें व सुभाषबाबूंचा पराभव झाला. तथापि देखील त्यांनीं गांधीजींना भेटण्याचा प्रयत्न केला. पण भेट झाली नाहीं. अखेर २८ एप्रिलला

कलकत्त्याला भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या बैठकींत त्यांनीं आपला राजीनामा सादर केला. काँग्रेसमध्यें दुफळी होऊं नये या एकाच हेतूनें प्रेरित होऊन ते काँग्रेसमधून बाहेर पडले. या प्रकरणीं एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. ती ही कीं, सुभाषबाबू हे जहाल मताचे पुढारी असल्यामुळें त्यांना ताबडतोब कायदेभंगाचा लढा सुरूं करावयास हवा होता. आणि त्या लढ्याचें पुढारीपण गांधीजींनीं घ्यावें असें त्यांचें म्हणणें होतें. पण गांधीजींना व इतर पुढाऱ्यांना हा उतावीळपणा पसंत नव्हता. योग्य समय येतांच आपण लढा सुरूं करूंच असें त्यांचें म्हणणें होतें. सुभाषबाबूंच्या राजीनाम्याची ही खरी पार्श्वभूमि आहे.

म. गांधी राजकोटला उपवास करीत असल्यामुळें ते त्रिपुरीस नव्हते व सुभाषबाबू फारच आजारी असल्यामुळें त्यांच्या वतीनें अध्यक्षांचें काम मौ. आझाद यांनीं पार पाडलें. या अधिवेशनांत काँग्रेसच्या घटनेबद्दल कांहीं दुरुस्त्या सुचविण्यांत आल्या व इजिप्त-मधील वफ्द पक्षाच्या शिष्टमंडळाचें स्वागत करण्यांत आलें. हिंदी संस्थानें, चीन, ब्रिटिशांचें परराष्ट्रीय धोरण वगैरेसंबंधीं कांहीं ठराव या बैठकींत मंजूर झाले, तथापि या अधिवेशनाचें सारसर्वस्व गोविंद वल्लभ पंतांच्या ठरावांत होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

त्रिपुरीनंतर एक वर्षानें मार्च १९४० मध्यें बिहार प्रांतांत रामगड येथें मौ. आझाद यांच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रीय सभेचें ५३ वें अधिवेशन भरलें. मागील अधिवेशनानंतर देशांत व परदेशांत इतक्या महत्त्वाच्या घडामोडी झाल्या कीं, त्यांचा या ठिकाणीं संक्षिप्त आढावा घेतला पाहिजे. सुभाषबाबूंनीं अध्यक्ष-पदाचा राजीनामा दिल्यावर बाबू राजेंद्रप्रसाद यांची अध्यक्ष

म्हणून निवडणूक झाली व त्यांनीं आपल्या जुन्या सहकाऱ्यांचीच वर्किंग कमिटी नेमली. राजकोट प्रकरणीं गांधीजींनीं आपली चूक कबूल केली तर सुभाषबाबूंनीं २१ मे रोजीं 'फॉरवर्ड ब्लॉक' नांवाचा कॉंग्रेसपेक्षां सवाई जहाल व पुरोगामी असा पक्ष स्थापन केला. सुभाषबाबूंच्या एकंदर वर्तणुकीमुळें त्यांच्यावर शिस्तभंगाचा ठराव करण्यांत येऊन त्यांना तीन वर्षेपर्यंत कॉंग्रेसमधून हद्दपार करण्यांत आलें. कॉंग्रेस-मधील या अंतर्गत बंडाळीचा बींमोड सुरू असतां तिकडे युरोपांत महायुद्धाचें भीषण रणकुंड पेटलें. युद्ध सुरू होतांच ९ सप्टेंबरला म. गांधींची व्हाइसरॉयबरोबर मुलाखत झाली व लागलींच वर्धा येथें वर्किंग कमिटीची बैठक भरून युद्धकालीन परिस्थितींत कॉंग्रेसनें आपलें काय धोरण ठेवावें याची चर्चा झाली. पुढें एक महिन्यानें वर्धा येथें ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची बैठक भरली. तिनें वर्किंग कमिटीच्या धोरणास एकमतानें पाठिंबा दिल्यामुळें आठ प्रांतांतील कॉंग्रेस मंत्रिमंडळांनीं एकदम राजीनामे दिले. कॉंग्रेसच्या या कृतीमुळें देशांत स्वाभा-विकच खळबळ उडाली, पण अहिंसावादी कॉंग्रेस मंत्रिमंडळांना हिंदुस्थानावर लादलेल्या युद्धाला सक्तीनें जुंपलें जाण्याची पाळी आल्यामुळें आपल्या प्रतिष्ठेसाठीं व त्याहीपेक्षां तत्त्वासाठीं त्यांना राजीनामे देण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. त्याबरोबर प्रांतिक गव्हर्नरांनीं सत्ता हातीं घेऊन घटना तहकूब केली. डिसेंबरमध्यें गांधीजींची व्हाइसरॉयबरोबर दुसऱ्यांदा मुलाखत घडून आली; पण त्यांतून निष्पन्न असें कांहींच झालें नाहीं.

त्रिपुरीनंतरच्या अशा विविध घटनांच्या पार्श्वभूमीवर १९४० च्या फेब्रुवारींत भरलेल्या रामगड कॉंग्रेसमध्यें महायुद्धासंबंधींचा प्रामुख्यानें

विचार व्हावा व काँग्रेसनें कोणती भूमिका घ्यावी याची चर्चा व्हावी यांत आश्चर्य नव्हतें. जागतिक महायुद्धाच्या भीषण छायेंत भरलेल्या या अधिवेशनाला एक प्रकारचें वीरश्रीयुक्त प्रतिकाराचें स्वरूप आलें होतें. या बैठकींत खरा असा एकच सर्वव्यापी ठराव झाला आणि तो म्हणजे युद्धविरोधाचा. काँग्रेसची अहिंसात्मक भूमिका व काँग्रेसचा युद्धविषयक दृष्टिकोण जगापुढें व राज्यकर्त्यांपुढें निःसंदिग्धपणें मांडण्यासाठीं रामगड काँग्रेसमध्यें हा जो ठराव करण्यांत आला त्यांत काँग्रेसचें ध्येय-सर्वस्व सांठविलेलें आहे असें म्हटल्यास चालेल. १९२७ च्या



वर्धा : १९४१

मद्रास काँग्रेसपासून काँग्रेसच्या अधिवेशनांत अधूनमधून युद्ध-विरोधाचे व जागतिक युद्धाच्या इषाऱ्याचे ठराव येत व ते पासहि होत. पण त्या वेळीं १९४० प्रमाणें प्रत्यक्ष युद्ध सुरू झालें नव्हतें किंवा तें हिंदुस्थानाच्या दाराशीं येऊन पोंचलें नव्हतें. त्यामुळें रामगड अधिवेशनापूर्वी झालेल्या ठरावांना तात्त्विक दृष्ट्या किंमत असली तरी प्रत्यक्ष व्यवहारदृष्ट्या फारसें महत्त्व नव्हतें. पण रामगड काँग्रेसचा ठराव युरोपांत युद्धाच्या ज्वाळा प्रत्यक्ष भडकल्यानंतर केलेला असल्यामुळें काँग्रेसची शक्ति जनतेच्या निदर्शनास आणण्याच्या दृष्टीनें त्याचें विशेष महत्त्व आहे.

त्रिपुरी काँग्रेसच्या वेळीं ज्याप्रमाणें अध्यक्षीय निवडणुकींत पक्षोपपक्ष दिसून आले त्याप्रमाणें रामगड काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठींहि तशीच लढत झाली. मात्र वर्किंग कमिटीनें एकमतानें पुरस्कृत केलेल्या मौ. अबुलकलाम आझाद यांच्यासारख्या एका थोर काँग्रेस पुढाऱ्याला कॉ. एम्. एन्. रॉय यांनीं केलेला विरोध हास्यास्पद होता. या निवडणुकींत मौ. आझादांना १८५४ मतें पडलीं व भाई रॉय यांच्या वांट्याला १८३ मतें आलीं. या सामन्यांत कोण विजयी होईल हें ठरल्यासारखेंच असल्यामुळें निवडणुकीच्या निकालाचें कोणाला आश्चर्य वाटलें नाहीं. मागील वर्षी सुभाषबाबूंच्या विरुद्ध मौलानांनीं आपली उमेदवारी मागें घेतली नसती तर त्या वेळींच ते निवडून आले असते इतकें त्यांना पाठबळ होतें. मौ. आझाद यापूर्वी १९२३ सालीं दिल्ली येथें भरलेल्या खास अधिवेशनाचे अध्यक्ष होते. मौलानांची ही अध्यक्षीय निवडणूक म्हणजे हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याचा पुरावाच होय, असे जनतेनें उद्गार काढले. दोन तपांची अविच्छिन्न काँग्रेसनिष्ठा, विधायक कर्तृत्व व लढाऊ मुत्सद्देगिरी या गुणांमुळें

मौ. आझादांचें नांव देशांत सर्वविश्रुत असल्यामुळें हिंदी राष्ट्रानें त्यांचें एकमुखानें स्वागत केलें.

कॉंग्रेसच्या ५२ वर्षांच्या कारकीर्दीत कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा मान आठ मुसलमान पुढाऱ्यांना मिळालेला आहे. बद्रुद्दिन तय्यबजी (१८८७), रहिमतुल्ला सयानी (१८९६), नबाब सय्यद महंमद बहादूर (१९१३), हसन इमाम (१९१८), हकीम अजमलखान (१९२१), मौ. अबुल कलाम आझाद (१९२३ खास), मौ. महंमदअल्ली (१९२३) व डॉ. अन्सारी (१९२७) यांच्यानंतर १९४० सालीं मौ. आझाद पुन्हां राष्ट्राध्यक्षपदीं विराजमान झाले.

बिहार प्रांतांत दामोदर नदीच्या कांठीं रामगड नांवाच्या खेड्यांत कॉंग्रेसचें ५३ वें अधिवेशन भरलें होतें. खेड्यांत भरलेली ही चौथी कॉंग्रेस. कॉंग्रेसचें आधिवेशन अशा ग्रामीण वातावरणांत भरविलें म्हणजे ज्या अडचणी यावयाच्या त्या रामगडलाहि आल्या. हजारों-लाखों प्रेक्षकांची व प्रतिनिधींची सोय करणें ही सोपी गोष्ट नव्हती, त्यांत आधिवेशनाच्या दिवशीं खूप पाऊस पडला. त्यामुळें मुख्य बैठकींत मोठमोठीं भाषणें होऊं शकलीं नाहींत, तथापि महत्त्वाचें कार्य झालें. या आधिवेशनांत एकच ठराव झाला, हें त्याचें वैशिष्ट्य होय. महायुद्धामुळें दरवर्षी होणारे आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे मामुली ठराव मागें पडले व चालू महायुद्ध, घटना-परिषद, कॉंग्रेसचें ध्येय, विधायक कार्यक्रम, सत्याग्रह, वगैरे अनेक प्रश्न या सर्वव्यापी ठरावांत अंतर्भूत झाले. हिंदी जनतेची संमति न घेतां हिंदुस्थान हें युद्धमान राष्ट्र म्हणून जाहीर केल्याबद्दल सरकारचा निषेध करण्यांत आला व ब्रिटिश सरकार हें युद्ध आपल्या साम्राज्यशाहीसाठीं लढत असल्यामुळें कॉंग्रेस

किंवा हिंदी राष्ट्र या युद्धांत भाग घेऊं शकणार नाहीं हें जाहीर करण्यांत आलें. या ठरावान्वयें संपूर्ण स्वातंत्र्याचा पुनरुच्चार करण्यांत आला व वयांत आलेल्या प्रत्येक माणसाला एक मत या तत्त्वावर निवडलेल्या घटनापरिषदेला पाठिंबा देण्यांत आला. देशाची घटना ही स्वातंत्र्य, लोकशाही व राष्ट्रीय ऐक्य यांवर उभारण्यांत यावी अशी या ठरावांत मागणी होती. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत चालू महायुद्ध व जागतिक शांतता याबद्दलचे आपले विचार मांडून काँग्रेसचें सामर्थ्य, शिस्त, संघटना व ऐक्य या त्रयींत आहे असें सांगितलें. महात्मा गांधींच्या नेतृत्वावर राष्ट्रानें विश्वास ठेवण्यावरच आपलें यश अवलंबून आहे; आजपर्यंत राष्ट्राला भूषणभूत अशा ज्या चळवळी झाल्या, त्यांना महात्माजींचें मार्गदर्शन होतें म्हणूनच त्या यशस्वी झाल्या, यापुढेंहि आपण त्यांच्यावर भरिभार ठेवला तरच आपला तरणोपाय आहे, असें मौ. आझादांनीं स्पष्टपणें सांगितलें.

रामगड काँग्रेसच्या अधिवेशनानंतर देशांत आणि परदेशांत इतक्या अकल्पित विद्युद्गतीनें घडामोडी झाल्या कीं, त्यांचा धांवता परामर्श घेणेंहि सोपें नाहीं. या घडामोडींमुळें १९४१, १९४२, १९४३, १९४४ व १९४५ या पांच वर्षांत काँग्रेसचें एकहि अधिवेशन होऊं शकलें नाहीं. आतां १९४६ च्या एप्रिल महिन्यांत दिल्ली येथें काँग्रेसचें ५४ वें अधिवेशन भरण्याचें निश्चित झालें आहे. ५३ आणि ५४ या दोन बैठकींच्या दरम्यान इकडचें जग तिकडे झालें असें यथार्थत्वानें म्हटल्यास हरकत नाहीं.

× × ×

१९४२ साल उजाडल्यानंतर पूर्वेकडून जपानचें आक्रमण जसजसें वाढूं लागलें तसतसें ब्रिटिश साम्राज्यशाहीचें धाबें दणाणूं लागलें व जपानचा हिंदुस्थानावर प्रत्यक्ष हल्ला होण्याची शक्यता दिसूं लागल्यामुळें हिंदी राष्ट्राचें आपल्याला सहाय्य मिळावें या हेतूनें पार्लमेंटनें सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांना हिंदुस्थानांत पाठविलें. हिंदी जनतेची मनधरणी करण्यासाठीं क्रिप्स यांनीं एक दिखाऊ योजना आपल्याबरोबर आणली होती. २३ मार्च रोजीं सर स्टॅफोर्ड क्रिप्स हिंदुस्थानांत दाखल झाले व १२ एप्रिल रोजीं



८ ऑगस्ट : १९४२

परत गेले. या मधल्या १९ दिवसांच्या अवधींत जपाननें हिंदुस्थानाकडे अधिक जोरानें मुसंडी मारली. जपाननें शस्त्रास्त्रानें भरलेल्या अमेरिकन जहाजांचा त्रिंकोमालीपासून विजगापट्टणपर्यंत पाठलाग केला. कोकोनाडा व विजगापट्टण या शहरांवर बॉंब टाकण्यांत आले, इतकेंच नव्हे तर विजगापट्टण बंदरांत असलेल्या लोकांवर मशीनगन्सचा मारा करण्यांत आला. जपानच्या या अनपेक्षित आक्रमणामुळें हिंदुस्थानवर जें अरिष्ट कोसळलें त्यामुळें हिंदी राष्ट्राच्या इतिहासांत १९४२ हें साल चिरस्मरणीय व क्रांतिकारक समजलें जाईल.

काँग्रेसच्या इतिहासाचा धांवता आढावा घेतांना या सालांत व यानंतर घडलेल्या घटनांचा थोडा विस्तारानेंच परामर्ष घेतला पाहिजे. १९४२ सालीं ज्या अनेक अघटित घटना घडून आल्या त्यायोगें या वर्षाला एक प्रकारचें असामान्य महत्त्व आलें आहे. केवळ नऊ ऑगस्टच्या लढ्यामुळेंच हें वर्ष संस्मरणीय झालें आहे असें नाहीं तर बंगालमधील भयंकर दुष्काळ, जागतिक महायुद्धांत ब्रिटिश साम्राज्यावर आलेलें गंडांतर, रशियाची पिछेहाट, अमेरिकन प्रदेशावर जपानची चढाई, जर्मनीचें वाढतें आक्रमक सामर्थ्य वगैरे अनेक कारणांमुळें जगांत व जागतिक महायुद्धाच्या क्षेत्रांत या विशिष्ट कालखंडानें आपलें अस्तित्व चांगलेंच गाजविलें. या सालांतच जर्मनीनें रशियाला मागें रेटत युक्रेनच्या पलीकडे कॉकेशसपर्यंत नेलें होतें व जपाननें अमेरिका व ब्रिटिश साम्राज्य यांच्यावर विद्युद्वेगी चढाई करून त्यांच्या साम्राज्याला सुरुंग लावला होता. जपाननें फिलिपाइन्स, मलाया, ब्रह्मदेश, सिंगापूर इत्यादि प्रदेशांवर आक्रमण केल्यामुळें चीनचें घाबें दणाणणें स्वाभाविक होतें व

तेवढ्यासाठीं मार्शल चिआंग-कै-शेक यांनीं हिंदुस्थानला धांवती भेट दिली. या भेटींत त्यांनीं म. गांधी व पं. जवाहरलाल यांच्या गांठी घेतल्या. चिनी राष्ट्रनेत्याचें ज्या कारणासाठीं हिंदुस्थानांत आगमन झालें त्याच कारणासाठीं ब्रिटिश मुख्य प्रधान चर्चिल यांनीं अमेरिकेच्या वाऱ्या केल्या. युरोप-अमेरिकेंत व पूर्वेकडे महायुद्ध चढत्या श्रेणीनें निकरावर येऊं लागल्यामुळें व दोस्तांची चहूंबाजूंनीं ससेहोलपट झाल्यामुळें युद्धाला विरोध करणाऱ्या काँग्रेसची मनधरणी करून तिला दोस्तांच्या बाजूनें युद्धांत सामील करून घेण्यासाठीं ब्रिटिश मंत्रिमंडळानें क्रिप्स योजना हिंदुस्थानाला देऊं केली. या योजनेंत प्रत्यक्ष तात्कालिक स्वातंत्र्यदानाचें असें कोणतेंच आश्वासन नव्हतें. युद्धोत्तर घोषणांचीं पोकळ अभिवचनें होतीं. त्यामुळें काँग्रेसनें ती योजना स्वाभाविकपणेंच फेंटाळून लावली. कॅबिनेटच्या दर्जाचें मध्यवर्ती राष्ट्रीय मंत्रिमंडळ नेमण्यांत येईल व त्यांना प्रत्यक्ष युद्धाशिवाय बाकीचे सर्व जबाबदारीचे अधिकार देण्यांत येतील असें सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांनीं आश्वासन दिलें होतें. पण पुढें त्यांनीं आपलें बोलणें फिरवलें.

महायुद्धामुळें हिंदी राष्ट्राची स्थिति दिवसेंदिवस अधिक खडतर व आणीबाणीची होत चालली. दोस्त राष्ट्रांनीं लोकशाही व स्वातंत्र्य यांच्या रक्षणासाठीं युद्ध पुकारलें, पण गेलीं दीडशें वर्षें गुलामगिरींत खितपत पडलेल्या हिंदुस्थानचें काय ? हा प्रश्न अनेक स्वातंत्र्यवादी हिंदी पुढाऱ्यांना अस्वस्थ करूं लागला. महात्मा गांधी हिंदी राष्ट्राच्या भवितव्याचें चिंतन करीत असतां त्यांना एकाएकीं एक दिव्य मंत्र स्फुरला, 'हिंदुस्थान सोडा.' गांधीजींनीं याचा उच्चार करतांक्षणींच देशांत अभूतपूर्व चैतन्य उत्पन्न झालें.

या 'चले जाव' घोषणेची पार्श्वभूमि गांधीजींनीं 'हरिजन' पत्रांत पुढीलप्रमाणें विशद केली: "ज्या वेळीं सबंध जगभर प्रचंड लढा चाललेला आहे व जगांतल्या सर्व राष्ट्रांचेंच काय, पण मानवतेचेंहि भवितव्य या लढ्याशीं निगडित आहे अशा वेळीं भविष्यकालीन वचनांना यत्किंचितहि किंमत नाहीं. चालू युद्धाचा जर जागतिक शांततेंत शेवट व्हावयाचा असेल तर जें काय करावयाचें तें आजच्या क्षणींच केलें पाहिजे. म्हणून हिंदी जनतेचें खरेंखुरें युद्धसहाय्य हवें असेल तर हिंदुस्थानची स्वातंत्र्याची मागणी पुरी झाली पाहिजे. 'चले जाव' ही घोषणा म्हणजे त्या मागणीचा शाब्दिक आविष्कार आहे. या घोषणेंत अखिल मानवतेला शोभेसा ब्रिटनविषयीं स्नेहभावच भरलेला आहे."

गांधीजींची 'चले जाव' घोषणा, हिंदुस्थानावरील जपानी युद्धाची कृष्णछाया व ब्रिटिश मंत्रिमंडळाचें दुराराध्य धोरण या सर्वांचा संगम होऊन ऑगस्ट १९४२ मध्यें मुंबईंत जी ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची बैठक भरली तिच्या सभोंवतालचें वातावरण क्रांतिकारक कल्पनांनीं निनादत होतें. जनतेच्या उत्साहाला सीमा नव्हती. यापूर्वींची ऑल इं. काँ. कमिटीची कोणतीहि बैठक इतकी गाजली नव्हती किंवा तिचें दुरून दर्शन घेण्यासाठीं एवढा प्रचंड जनसंमर्द लोटला नव्हता. या बैठकींत सुप्रसिद्ध आठ ऑगस्टचा ठराव झाला व गांधीजींनीं आगामी लढ्याचें नेतृत्व हातीं घ्यावें असें ठरलें. मात्र लढा सुरू करण्यापूर्वीं व्हाइसरॉयबरोबर पूर्वनियोजित वाटा-घाटी व विचारविनिमय केल्याशिवाय लढ्याचें रणशिंग फुंकलें जाणार नव्हतें. पण सरकारला तेवढाहि दम निघाला नाहीं व ही बैठक संपते न संपते तोंच पहाटेच्या प्रहरीं महात्मा गांधी व देशांतले

बहुतेक सर्व प्रमुख पुढारी यांना अटक करून सरकारनेंच या देशांत असंतोषाचा व क्षोभाचा वणवा पेटविला आणि चळवळ सुरू केली. सरकारच्या या दडपशाहीच्या धोरणामुळेंच सबंध देशांत प्रचंड हिंसात्मक आंदोलन घडून आलें, यांत यत्किंचितहि वाद नाहीं. या आंदोलनाची जबाबदारी सरकारनें जरी कॉंग्रेसवर टाकण्याचा प्रयत्न केला तरी जनतेला हें पूर्णपणें ठाऊक आहे कीं, कॉंग्रेस पुढाऱ्यांना आकस्मिकपणें अटक करण्याचा अविचार सरकारनें केला नसता तर देशांत एवढी आग पेटली नसती. कॉंग्रेसनें जी सामुदायिक चळवळ अधिकृतपणें सुरू केलेली नव्हती ती कॉंग्रेसची कशी ठरते ? या दीड दोन वर्षांच्या अवधींत देशांत जे विविध प्रकार घडून आले त्यांना जरी कॉंग्रेसचा आधिकृत पाठिंबा नव्हता तरी त्या चळवळीमागील जागृति व प्रतिकारवृत्ति कोणालाहि गौरवास्पदच वाटली असेल.

ज्यायोगें देशांत अभूतपूर्व अशी खळबळ व चळवळ सुरू झाली त्या सुप्रसिद्ध आठ ऑगस्टच्या ठरावांतील महत्त्वाचीं मर्मवाक्यें येथें उद्धृत केलीं पाहिजेत. "या देशांतील ब्रिटिश सत्तेचा ताबडतोब अंत होण्यावर युद्धाचें भवितव्य, स्वातंत्र्य आणि लोकशाही यांचा विजय अवलंबून आहे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची घोषणा होतांच तात्पुरतें सरकार स्थापन करण्यांत येईल व स्वतंत्र हिंदुस्थान संयुक्त राष्ट्रांचा दोस्त होऊन त्यांच्या-बरोबर युद्धांत भाग घेईल. पण तसें न झालें तर हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या हक्कासाठीं अत्यंत मोठ्या प्रमाणांत अहिंसात्मक लढा सुरू करण्याला ही कमिटी मान्यता देत आहे. या लढ्याचें नेतृत्व गांधीजींकडे जाणें अपरिहार्य नव्हे, क्रमप्राप्तच आहे. लोकांनीं हें सदैव लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, अहिंसा हा

चळवळीचा पाया आहे. कदाचित् एक वेळ अशी येईल कीं, काँग्रेसकडून जनतेला कोणत्याहि प्रकारचें मार्गदर्शन करणें अशक्य होईल, त्या वेळीं प्रत्येकानें स्वतःचें स्वतःच मार्गदर्शक व्हावें व सर्वसामान्य सूचनांच्या अनुरोधानें कार्य करावें. शेवटीं हें स्पष्टपणें सांगावेसें वाटतें कीं, सामुदायिक स्वरूपाचा अहिंसात्मक लढा सुरूं करून काँग्रेस सत्ता मिळविण्यास आतुर झालेली नाहीं. जी शक्ति व जी सत्ता मिळेल ती सबंध हिंदी जनतेकडेच जाईल." या ठरावानंतर सरकारनें केलेल्या धरपकडीमुळें देशांत जी सर्वव्यापी चळवळ झाली ती अधिकृतपणें काँग्रेसची नव्हती तरी तिच्यांत काँग्रेस मनोवृत्तीच्या लोकांनीं भाग घेतला. या चळवळींत मार्गदर्शन करावयाला महात्मा गांधी, वर्किंग कमिटी किंवा प्रमुख पुढारी मोकळे नसल्यामुळें तिचें स्वरूप निर्भेळ अहिंसेचें राहिलें नाहीं.

गांधीजींना पुण्यास आगाखान बंगल्यांत ठेवण्यांत आलें व वर्किंग कमिटीच्या सभासदांची अहमदनगरच्या किल्ल्यांत रवानगी करण्यांत आली. आणि बाकीचे पुढारी येरवड्यास नेण्यांत आले. गांधीजी व इतर प्रमुख पुढारी यांच्या अटकेची बातमी वणव्यासारखी पसरली व जनतेच्या अंतःकरणांत क्षोभाचा प्रचंड आगडोंब भडकला. जालियनवाला बागेच्या कत्तलीनंतर १९१९ सालीं गांधीजींना अमृतसरकडे जातांना पकडण्यांत आल्यावर देशांत जशी खळबळ उडाली त्याप्रमाणेंच याहि वेळेला घडलें. मुंबई-सारख्या मोठ्या शहरीं हजारों लोक जमले व पोलिसांनीं त्यांच्या-वर लाठी चालविली किंवा अश्रुवायूचा उपयोग केला. इतकेंच नाहीं तर बंदुका व मशीनगन्साहि चालविल्या. सरकारच्या या अत्या-चारी कृत्यामुळें आधींच प्रक्षुब्ध झालेली जनता एकदम भडकली

व तिचा तोल सुटला आणि त्यांत मार्गदर्शन करावयाला कोणीच पुढारी बाहेर नसल्यामुळें या खवळलेल्या जनतेनें वाटेल त्या प्रकारचीं कृत्यें करावयाला मागेंपुढें पाहिलें नाहीं. कॉंग्रेसतर्फे किंवा लोकपक्षाकडून या १९४२ च्या चळवळीचा इतिहास अजून लिहिला जावयाचा आहे. तोंपर्यंत सरकारतर्फे प्रसिद्ध झालेल्या हकीकतीवरून देशांत काय काय घडून आलें याची कल्पना यावयास हरकत नाहीं.

लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व कौन्सिल ऑफ स्टेट या कायदेमंडळांत लोकपक्षिय सभासदांनीं विचारलेल्या प्रश्नांना सरकारकडून पुढील माहिती पुरविण्यांत आली. "कॉंग्रेस पुढाऱ्यांना ९ ऑगस्ट रोजीं सकाळीं अटक करण्यांत आली. त्याच दिवशीं मुंबईत दंगेखोरांचें साम्राज्य सुरू झालें. इतर प्रांतांत ही बातमी पोंचावयास दोन तीन दिवस लागले व ता. ११ विशेषतः ता. १२ रोजीं देशांत सर्वत्र मोडतोडीचे व जाळपोळीचे प्रकार घडून आले. दंगेखोरांचा मुख्य मोर्चा दळणवळणाच्या साधनांकडे असून रेल्वे, टेलिफोन व टेलिग्राफ यांचा विध्वंस करण्याच्या कामीं त्यांनीं लक्ष पुरविलें. ही अत्याचाराची लाट मुंबई, मद्रास, मध्यप्रांत, बंगाल, संयुक्त प्रांत व बिहार या प्रांतांत एकाच वेळीं उसळली. पंजाब, सिंध, सरहद्द, ओरिसा व आसाम हे प्रांत त्या मानानें शांत राहिले. बिहार व संयुक्त प्रांत या दोन प्रांतांत अत्याचारांचा अगदीं कळस झाला. कांहीं काळ या प्रांतांत दंगेखोरांचेंच राज्य झालें होतें. सबंध देशांत झालेल्या दंगलींत २५८ रेल्वे-स्टेशनें जाळण्यांत आलीं. ५५० पोस्ट ऑफिसांवर हल्ले होऊन ५० भस्मसात् झालीं. तारा तोडल्याचीं ३५०० उदाहरणें आढळून आलीं. ७० पोलिस ठाणीं व १४० सरकारी इमारती यांवर हल्ले झाले, १ लाख रुपयांची लूट करण्यांत आली.

दंगेखोरांच्या विध्वंसनाला व मोडतोडीला आळा घालण्यासाठीं सरकारनें पुढील उपाय योजले : (१) काँग्रेस कमिट्या बेकायदेशीर ठरविल्या व सर्व लहानमोठ्या पुढाऱ्यांना स्थानबद्ध करण्यांत आलें. (२) ही चळवळ युद्धकार्याला विरोधी असल्यामुळें भारत संरक्षण कायद्याचा उपयोग करण्यांत आला. (३) सामुदायिक दंड, स्पेशल कोर्टें वगैरे गोष्टी अंमलांत आणल्या. (४) देशाच्या हितासाठीं वार्ताप्रकाशनावर निर्बंध घालण्यांत आले. (५) दंगेखोरांना तोंड देण्यासाठीं व त्यांना कह्यांत आणण्यासाठीं पोलिसांना अनेक वेळां गोळीबार करावा लागला. त्यांत २९० लोक ठार होऊन १०६० जखमी झाले. (६) बिहारमध्यें दंगेखोरांना हटविण्यासाठीं विमानांतून मशीनगन्सचा मारा करण्यांत आला. (७) १९४२ अखेर ६०२२९ लोकांना अटक करण्यांत आली व १८०० जणांना भारत संरक्षण कायद्यान्वयें स्थानबद्ध केलें.

★ ★ ★

१९४२ च्या आंदोलनाबद्दल पं. जवाहरलाल नेहरू, मौ. आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, शंकरराव प्रभृति वर्किंग कमिटीच्या सभासदांनीं एकमुखानें प्रशंसेचे उद्गार काढले आहेत. या उद्गारांपैकीं पुढील उद्गार संस्मरणीय वाटतील. " गेल्या तीन वर्षांत हिंदुस्थाननें जी प्रगति केली ती एरवीं पन्नास वर्षांतहि झाली नसती. या प्रगतीचें माप तीन गोष्टींवरून कळून येतें. पाहिली गोष्ट ही कीं, हिंदुस्थान हें मेलेलें राष्ट्र आहे ही जगाची भावना साफ गेली व जगांतले लोक खडबडून जागे झाले. साडेतीन वर्षांपूर्वी जो स्वाभिमान व जी क्रांति लोकांमध्यें दिसत नव्हती ती आज दिसत आहे. गेल्या आंदोलनानें

हिंदुस्थानांत निर्भयता निर्माण झाली....'' "१८५७ नंतर हिंदुस्थानांत एवढी प्रचंड स्वातंत्र्याची चळवळ झाली नाहीं....'' "राष्ट्राच्या स्वातंत्र्यप्राप्तीचा दुर्दम्य निर्धार या भडकत्या ज्वालांनीं प्रकट केला. देशाच्या शूर पुत्रांनीं व स्वातंत्र्य-वीरांनीं या यज्ञकुंडांत उड्या घेतल्या व दडपशाही आणि छळ यांची क्षिति न बाळगतां आपल्या त्यागानें अखिल राष्ट्राचा स्वातंत्र्यनिर्धार निदर्शनास आणून दिला. या तीन वर्षांचा स्फूर्ति-प्रद व अभिमानास्पद इतिहास अजून लिहिला जावयाचा आहे.'' ता. २१ सप्टेंबर १९४५ रोजीं मुंबईस भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या बैठकींत राष्ट्राध्यक्ष आझाद यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत पुढील उद्गार काढले : "गेल्या तीन वर्षांचा स्फूर्तिप्रद इतिहास अजून लिहिला जावयाचा आहे. अनेक वर्षें हिंदुस्थानच्या कोट्यवधि लोकांच्या अंतःकरणांत उत्पन्न झालेले स्वातंत्र्याचे स्फुलिंग आरंभीं धुमसलेले दिसत होते. पण त्यांत ज्योत आहे कीं नाहीं याची शंका वाटत होती. पण अनंत हस्तांनीं या अग्नीला वारा घातला गेला आणि गेल्या तीन वर्षांत त्याच्या ज्वाळा भडकूं लागल्या. पुढाऱ्यांना पकड-ल्यानें या ज्वाला विझून जातील अशी सरकारची अपेक्षा, पण उलट या ज्वाला सहस्र जिव्हांनीं अधिकाधिकच उसळूं लागल्या. जनतेच्या अंतःकरणांतील स्वातंत्र्यभावनेची आग आतां देशभर पसरली आहे व ती आतां विझाविणें आटोक्याबाहेरचें आहे. साऱ्या राष्ट्रानें आपला स्वातंत्र्याचा निर्धार प्रकट केला आहे व त्यासाठीं अमोल त्यागाला तें तयार आहे. हाच आपला अभि-मान आणि हीच आपली दौलत.''


★ ★ ★

देशांत सामुदायिक चळवळ सुरू असतां महात्मा गांधी आगाखान पॅलेसमधून सरकारबरोबर पत्रव्यवहार करीत होते, या चळवळीची जबाबदारी काँग्रेसवर आहे असें गृहमंत्र्यानें म्हटल्यावरून गांधीजींनीं त्याचा खुलासा विचारला. या उत्तरा-प्रत्युत्तराच्या अनुषंगानें महात्माजींनीं ता. २९ जानेवारी रोजीं २१ दिवसांचा उपवास करण्याचा निर्धार केला. ' सरकारनें केलेली हिंसा व हजारों–लाखों लोकांची दुष्काळी हत्या यांतून कांहीं मार्ग निघत नाहीं म्हणून मी सत्याग्रहाचा शेवटचा उपाय म्हणून उपवास करीत आहें, असा गांधीजींनीं स्पष्ट खुलासा केला होता. या २१ दिवसांच्या खडतर दिव्यांतून गांधीजी निर्विघ्नपणें पार पडावेत म्हणून त्यांच्या सुटकेची सार्वत्रिक मागणी करण्यांत आली; पण सरकारनें ती धुडकावली. तथापि गांधींनीं आपला संकल्पित उपवास (ता. ९–२–४३ ते ता. ३–३–४३) मोठ्या मनोधैर्यानें व दृढनिश्चयानें पार पाडला. गांधीजींचा उपवास सुरू झाल्यावर त्यांच्या मुक्ततेसाठीं अखिल भारतीय पुढारी परिषदेनें निकराचा प्रयत्न केला; पण दुराराध्य चार्चिल मंत्रिमंडळानें तिला जुमानलें नाहीं. तथापि गांधीजींच्या उपवासानिमित्त सरकारचा निषेध म्हणून लो. अणे, नलिनीरंजन सरकार व सर एच्. पी. मोदी यांनीं व्हाइसरॉय–कौन्सिलचे राजीनामे दिले. गांधीजींच्या उपवासाचा सरकारावर यत्किंचितहि परिणाम घडून आला नाहीं.

१९४२ च्या चळवळीचे आनुषंगिक परिणाम म्हणून पुढील गोष्टींचा निर्देश केला पाहिजे. सिंधचे मुख्य प्रधान अल्लाबक्ष यांनीं सरकारी पदवीचा त्याग केला म्हणून गव्हर्नरनें त्यांना बडतर्फ केलें. प्रे. रूझवेल्ट यांचे खास प्रतिनिधि वुइल्यम फिलिप्स

गांधीजींना भेटण्यास गेले होते. पण त्यांना परवानगी देण्यांत आली नाहीं. चिमूर प्रकरणानिमित्त प्रो. भनसाळी यांनीं उपवास केला व सरकारनें त्यांच्यावर अनेक निर्बंध घातले. आगाखान बंगल्यांत स्थानबद्ध केल्यावर आठच दिवसांनीं महादेव देसाई मृत्यु पावले व २१ फेब्रुवारी १९४४ रोजीं सौ. कस्तुरबा गांधींचें तेथेंच प्राणोत्क्रमण झालें.

गांधीजी आगाखान बंगल्यांत मलेरियानें आजारी पडल्यामुळें ता. ६ मे १९४४ रोजीं सरकारनें त्यांची बिनशर्त मुक्तता केली. सुटका होतांच त्यांनीं ताबडतोब जाहीर करून टाकलें



कै. महादेव देसाई व कस्तुरबा : १९४२

कीं, ८ ऑगस्टच्या ठरावांतील सामुदायिक सत्याग्रहाचें कलम आपोआप रद्द झालें आहे, मात्र ठरावांतील इतर भाग जसाच्या तसा अस्तित्वांत आहे. न्यूज क्रॉनिकल पत्राचे प्रतिनिधि स्टुअर्ट गेल्डर यांना गांधीजींनीं जी मुलाखत दिली त्यांत त्यांनीं आपले तडजोडीचे मुद्दे मांडले होते. पण सरकारकडून त्याची दखल घेतली गेली नाहीं. १५ ऑगस्ट १९४४ रोजीं महात्मा गांधी व बॅ. जीना यांची मुंबईला भेट होण्याचें ठरलें होतें. या भेटीची पार्श्वभूमि गांधीजी तुरुंगांत असतांनाच तयार झाली होती व श्री. राजगोपालाचार्य यांनीं त्या बाबतींत मध्यस्थाची भूमिका घेऊन कांहीं मुद्दे तयार केले होते. जीनांच्या आजारीपणामुळें ही मुलाखत पुढें एक महिन्यानें झाली आणि आगाऊ अपेक्षा केल्याप्रमाणें जीनांच्या हटवादी-पणामुळें त्यांतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. पण ही मुलाखत होण्यापूर्वी हिंदुस्थानचे नवे व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनीं असा घूत्कार केला होता कीं, देशाच्या प्रगतीसाठीं केवळ कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांचें ऐक्य होऊन भागणार नाहीं, त्यासाठीं देशांतील एकूण एक सर्व पक्षांचें एकमत झालें पाहिजे.

तिकडे युरोपांत युद्धाचें पारडें जसजसें दोस्तांच्या बाजूला फिरूं लागलें तसतसें हिंदी प्रश्नाकडे अधिक लक्ष द्यावें असें चर्चिल-मंत्रिमंडळाला वाटूं लागल्याचें दृश्य चिन्ह मार्च १९४५ मध्यें हिंदी जनतेला प्रथम दिसलें. हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीबद्दल बोलणें करण्यासाठीं व्हाइसरॉय वेव्हेल इंग्लंडला गेले. मध्यंतरींच्या काळांत जर्मनीचा पाडाव झाला व युरोप-पुरतें तरी महायुद्ध समाप्त झालें. १४ जून १९४५ रोजीं

वेव्हेल यांनीं रेडिओवर जाहीर भाषण करून ब्रिटिश सरकारच्या हिंदुस्थानाविषयक धोरणाची आशादायक कल्पना दिली आणि कॉंग्रेस वार्किंग कमिटीच्या सभासदांना ताबडतोब मुक्त करण्यांत येईल अशी घोषणा केली. या भाषणांत त्यांनीं असेंहि सांगितलें कीं, २५ जून रोजीं सिमला येथें हिंदुस्थानांतील प्रमुख पक्ष-नेत्यांची परिषद भरविली जाईल व मध्यवर्ति राष्ट्रीय मंत्रिमंडळ बनविण्यासंबंधींचा विचार केला जाईल. या घोषणेप्रमाणें म.गांधी, कॉं. वार्किंग कमिटीचे सभासद व देशांतील इतर पक्ष–पुढारी सिमल्यास जमले व व्हाइसरॉयांची संकल्पित परिषद भरली. या तात्पुरत्या मध्यवर्ति मंत्रिमंडळांत हिंदु व मुसलमान सभासदांची समसमान संख्या असेल, हें तत्त्व कॉंग्रेसनें मान्य केलें होतें; पण बॅ. जीनांनीं लीगचेच सर्व मुसलमान घेतले पाहिजेत असा हट्ट धरल्यामुळें अखेर ही परिषद २१ जुलैला मोडली. या अपयशाचें खापर बॅ. जीनांच्याच डोक्यावर निःसंशयपणें फुटतें. वेव्हेल-योजनेंत वार्किंग कमिटीच्या मुक्ततेशिवाय गृह, फडाणिशी, पर-राष्ट्रीय वगैरे खातीं जनतेच्या स्वाधीन करण्याची तयारी, स्वातंत्र्याची घटना तयार करण्यास मान्यता, व्हेटोचा उपयोग समंजसपणें करण्याचें आश्वासन, सवर्ण हिंदु व मुसलमान यांना कार्यकारी मंडळांत समान प्रतिनिधित्व, प्रांतिक कारभारांत संयुक्त मंत्रिमंडळें, जपानच्या पराभवांत व युद्धोत्तर योजनेंत भाग घेणें, उभयपक्षीं झाल्या गेल्या गोष्टी विसरून क्षमा करणें इत्यादि गोष्टी होत्या. त्यामुळेंच कॉंग्रेसनें सिमला परिषदेंत भाग घेण्याचें ठरविलें. बॅ. जीनांच्या प्रतिगामी दुराग्रहामुळें जरी ही परिषद मोडली असली तरी राजकीय पेचप्रसंग सोडविण्याच्या दृष्टीनें कॉंग्रेसनें आपल्यापरीनें जोराची खटपट केली हें दिसून येईल.

११ डिसेंबर १९४५ रोजीं कलकत्ता येथें भरलेल्या काँग्रेस वर्किंग कमिटीनें १९४२ ची चळवळ व अहिंसा यासंबंधीं जो महत्त्वाचा ठराव केला त्यावरून काँग्रेस आपल्या ध्येयापासून यत्किंचितहि विचलित झाली नाहीं हें दिसून येईल. या ठरावाच्या वेळीं गांधीजी हजर होते. हा ठराव पुढीलप्रमाणें आहे : " ऑगस्ट १९४२ मध्यें प्रमुख काँग्रेस पुढाऱ्यांच्या अटकेनंतर मार्गदर्शन नसलेल्या जनतेनें आपल्या हातीं सूत्रें घेतलीं व बहुतेक स्वयंप्रेरणेनें कृति केली. लोकांनीं शौर्याचीं व त्यागाचीं जरी अनेक कृत्यें केलीं तरी त्यांनीं अशींहि कृत्यें केलीं कीं त्यांचा अहिंसेंत समावेश करतां येणार नाहीं. म्हणून जनतेच्या मार्गदर्शनासाठीं वर्किंग कमिटीला ही गोष्ट नमूद करणें आवश्यक वाटतें कीं, १९२० सालीं काँग्रेसनें स्वीकारलेलें अहिंसेचें धोरण आजहि जसेंच्या तसें चालू आहे व अशा अहिंसेंत सार्वजनिक मालमत्ता जाळणें, रेल्वेगाड्या पाडणें व धाकदपटशा दाखविणें यांचा समावेश होत नाहीं. वर्किंग कमिटीचें असें मत आहे कीं, १९२० च्या काँग्रेसच्या ठरावांत नमूद केलेलें व नंतर वेळोवेळीं वाढविलेलें व स्पष्टीकरण केलेलें अहिंसेचें धोरण आणि त्यानुसार कृति यायोगें हिंदुस्थानचा दर्जा पूर्वीपेक्षां निःसंशय वाढलेला आहे." या अहिंसेच्या ठरावाबरोबरच वर्किंग कमिटीनें बाबू सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंदसेनेसंबंधीं सहानुभूति दाखविणारा एक ठराव केला आहे.

मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद यांनीं काँग्रेससंबंधीं एके ठिकाणीं जे उद्गार काढले ते येथें उद्धृत केले असतां या लेखाचा योग्य समारोप होईल असें वाटल्यावरून ते पुढें देत आहे:

" काँग्रेस संस्था हें एक फार मोठें राष्ट्रीय स्फूर्तिस्थान आहे. ती वाढविणें व टिकविणें हें प्रत्येक हिंदी गृहस्थाचें कर्तव्य असावयास पाहिजे. जें भावी स्वातंत्र्ययुद्ध पुढें येणार आहे त्यांत या स्फूर्तिस्थानाचें कार्य सारखें वाढतच जाणार आहे हें निश्चित आहे. आपली वल्हीं क्षणभरहि थांबविण्यास वेळ नाहीं. व्हावयाचें कार्य अद्याप फार मोठें आहे आणि त्यासाठीं अविश्रांत श्रम, अमर्याद स्वार्थत्याग व अचल निष्ठा यांची जरूरी आहे. पूर्ण स्वराज्यप्राप्तीपेक्षां या गोष्टी अणुमात्र कमी महत्त्वाच्या नाहींत. ज्या व्यक्तींनीं आपले प्राण अर्पण केले, ज्यांनीं यातना सोसल्या आणि स्वदेशप्रेमासाठीं जे अद्यापहि यातना भोगीत आहेत त्या सर्व ज्ञात वा अज्ञात व्यक्तींना आपण वंदन करूं या. तसेंच ज्यांनीं या प्रचंड संस्थेचें बीजारोपण केलें व आपल्या अविश्रांत श्रमांनीं व स्वार्थत्यागानें तें बीज वाढवलें त्यांच्याबद्दलहि आपली कृतज्ञता आपण व्यक्त करूं या. "

समाप्त

एकमेव विक्रेते
'सरस्वती'
२९१ शनवार पेठ, पुणें २.

प्रकाशक
वि. वि. बापट,
चंद्रिका प्रकाशन,
सदाशिव, पुणें २.

मुद्रक
दा. त्र्यं. जोशी,
चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.